CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २८० | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## थोडक्यात...

**जनता विकासाच्या पाठीमागे : फडणवीस**

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये सहकुटुंब मतदानाचा अधिकार बजावला आहे. यावेळी त्यांनी म्हटले की, लोकांनी घराबाहेर पडून मोठ्या प्रमाणात मतदान करावे. यावेळी त्यांनी राज ठाकरे यांच्या टिकेवरही उत्तर दिले. दुबार मतदारांच्या आरोपांवर फडणवीस पुढे म्हणाले, दुबार मतदार शोधण्याचं काम इलेक्शन कमिशनने करेल. आत बसलेल्या एजंटने त्यावर आक्षेप घ्यायला हवा. कोणी दुबार मतदान केलं तर आम्हीही त्यावर आक्षेप घेऊ. पण हे मारामारी करणारे कोण आहेत. मतदान कमी झालं पाहिजे, याकरिता केलेला हा प्रयत्न आहे.

**मतदानदिनी मेट्रो धावणार मध्यरात्रीपर्यंत**

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई सज्ज झाली आहे. मतदानाचा कार्यात गुंतलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी मुंबई मेट्रोच्या 'अ‍ॅक्वा लाईन'ने (मेट्रो–३) कंबर कसली असून, गुरुवारी विशेष अतिरिक्त फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणूक ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांना वेळेत केंद्रावर पोहोचता यावे, यासाठी मेट्रोची सेवा पहाटे ५.०० वाजल्यापासूनच सुरू होईल. तसेच, रात्री उशिरापर्यंत कामावरून परतणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ही सेवा मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. सामान्य दिवसांच्या तुलनेत मतदानाच्या दिवशी या विशेष फेऱ्यांमुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर होणार आहे.

**शाई पुसली, एकाला चोप**

**पुणे :** पुण्यातील धायरीत प्रभाग ३४ मधील नारायणराव सणस विद्यालय केंद्रात लयात मतदान करून झाल्यावर बोटावर लावलेली शाई लगेचच पुसली जात होती. बोटावर लावल्या जाणाऱ्या शाई ऐवजी केमिकल लावलं जात आहे, असा आरोप राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. हा प्रकार उघडकीस आल्यावर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून एकाला चोप देण्यात आला आहे. निवडणूक प्रतिनिधीवर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून पोलीसांमध्ये तक्रार नोंदवली जाणार आहे.

**मुंबई मनपासाठी 'पाडू' मशीनचा वापर**

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीची मतमोजणी १६ जानेवारीला पार पडणार आहे. मुंबई महापालिकेच्या २२७ प्रभागांसाठी होणाऱ्या निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि निर्विघ्न पार पाडण्यासाठी प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे ठरवले आहे. यामध्ये 'पाडू' म्हणजेच प्रिंटिंग ऑक्झिलरी डिसप्ले युनीट ही यंत्रणा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. बंगळुरूतील मेसर्स भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड म्हणजेच बीईएल यांनी ही यंत्रणा विकसित केलीये. मुंबई महापालिकेला अशा १४० यंत्रांचा पुरवठा करण्यात आला.

**मतदान प्रक्रिया शांततेत : आयुक्त**

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील मतदान हे शांततेत सुरू आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेवर पोलिसांची बारकाईने नजर आहे. मतदान केंद्रामध्ये मोबाईल फोन घेऊन जाण्यास मनाई असताना मोबाईल नेणारे २५ ते ३० मोबाईल जप्त केले आहेत. पैसे वाटपाच्या तक्रारी संदर्भात पोलिसांनी शहानिशा केली असून असा कुठलाही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. अशी माहिती छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिली.

**मुंबईत १० लाख दुबार मतदार**

**मुंबई :** महापालिका निवडणुकीच्या मतदानानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर आणि निवडणूक व्यवस्थेवर जोरदार टीका केली. कसाही मार्ग वापरून निवडणुका जिंकण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असा आरोप करत त्यांनी मतदार याद्या, मतदान प्रक्रिया आणि मतमोजणी यावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. राज ठाकरे म्हणाले की, मुंबईत तब्बल दहा लाख दुबार मतदार आढळून आले आहेत. काही ठिकाणी मतदारांची नावे पुसली जात असल्याचे प्रकार समोर येत असून, त्यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर संशय निर्माण झाला आहे. संपूर्ण प्रशासन सत्ताधाऱ्यांच्या हातातील बाहुले बनले आहे, अशी टीकाही त्यांनी केली. मतदान प्रक्रियेबाबत बोलताना त्यांनी आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित केला. मतदानानंतर वापरली जाणारी अमिट शाई न वापरता मार्कर पेनचा वापर होत आहे, असा आक्षेप घेतला.

# राज्यात बोगस मतदारांचा सुळसुळाट

## ईव्हीएम फोडले । बोगस मतदार पकडले । उमेदवारांवर हल्ला । मतदानाला गालबोट

**मुंबई :** राज्यातील २९ महापालिकांसाठी महानगरांमध्ये मतदानाला सकाळपासूनच सुरुवात झाली आहे. मात्र, बोगस मतदान, मतदान यंत्रातील बिघाड, बोटावरील शाई पुसणे, दुसऱ्याच व्यक्तीने मतदान करुन जाणे यांसह अनेक गैरप्रकार समोर येत आहेत. त्यावरुन, आता विरोधी पक्षातील नेत्यांनी ओरड सुरू केली असून स्थानिक मतदान केंद्रावरील लोकही व्हिडिओच्या माध्यमातून भूमिका मांडत आहेत. त्यातच, पुणे, सोलापूर, मुंबई आणि जालन्यासह काही ठिकाणी बोगस मतदार पकडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सोलापुरात कर्नाटकमधून गाड्या भरुन मतदार आणल्याचा दावा समाजवादी पक्षाकडून करण्यात आला आहे.

पुण्यातील प्रभाग क्रमांक ४१ चे उमेदवार प्रमोद नाना भानगिरे यांनी स्वतः महादेव वाडी उंड्री या परिसरात एका खासगी गाडीतून ग्रामीण भागातून काही लोकांना मतदानासाठी आणण्यात आल्याचा आरोप केला आहे. नाना भानगिरे हे शिवसेना पुणे शहरप्रमुख आहेत, त्यांनी स्वत: प्रभाग क्रमांक ४१ महादेववाडी उंड्री या प्रभागातील उंड्री चौक येथे बोगस मतदान पकडले आहे आहेत. तसेच, संबंधितांवर पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केलीय.

भाजप उमेदवाराच्या घरावर हल्ला

नाशिकच्या प्रभाग क्रमांक २१ मध्ये तणाव निर्माण झाला आहे. भाजप उमेदवार नितीन खोले हे पैसे वाटप करत असल्याचा आरोप करत शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या घरावर हल्ला केला. यावेळी दोन्ही गटाचे पदाधिकारी आमनेसामने आल्याने नाशिकमध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.





छत्रपती संभाजीनगरमधील सिडको एन–३–४ परिसरातील संत मीरा मतदान केंद्रावर मोठा राडा झाला. भाजप उमेदवाराने पोलचीटवर पक्षाचे चिन्ह आणि कोडिंग असलेले टी–शर्ट वापरल्याचा आक्षेप शिवसेना आणि अपक्ष उमेदवारांनी घेतला. यावरून अपक्ष उमेदवार आणि पोलिसांमध्ये जोरदार शाब्दिक बाचाबाची झाली. परिस्थिती पाहता पोलीस आयुक्तांनी स्वतः घटनास्थळाची पाहणी केली.

जालन्यातील प्रभाग क्रमांक ९ मधील डबल जिन परिसरामध्ये एका मतदाराने बोगस मतदान केल्याचा संशय मतदान प्रतिनिधींनी केला आहे. या संशयावरून संबंधित मतदाराला पोलिसांनी ताब्यात घेतलं. संशयित मतदाराची सध्या पोलिसांकडून विचारपूस केली जात आहे, खात्री झाल्यानंतर पुढील कारवाई करणार असल्याचं पोलिसांची सांगितल. संशयित मतदाराने दुसऱ्या नावावर मतदान केल्याचा आरोप मतदान प्रतिनिधींनी केला असून मधुकर देठे असं पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयित मतदाराचे नाव आहे. दरम्यान संशयित मतदाराने कोणत्या नावाने मतदान केलं आहे, याची खात्री संबंधित निवडणूक अधिकाऱ्याकडून घेत असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी दिली आहे.

सोलापुरातील प्रभाग १४ मध्ये एमआयएम आणि समाजवादी पक्षात वाद झाल्याचं पाहायला मिळालं. एमआयएमकडून बोगस मतदानासाठी कर्नाटकातून गाड्या आणल्याचा आरोप समाजवादी पक्षाकडून करण्यात आला आहे. जवळपास दोन हजार मतदार बोगस मतदानासाठी आणल्याचा आरोप समाजवादीकडून करण्यात आला. मात्र, हे बोगस मतदार समाजवादी पक्षाकडून पकडल्यानंतर बोगस मतदार माफी मागून निघून गेल्याचा दावाही समाजवादीचे उमेदवार रियाज खरादी यांनी केला आहे.

बोरिवली प्रभाग क्रमांक १० मध्ये भगवा गार्ड यांनी फेक वोटर आयडी पकडले आहेत. भाजपकडून फेक वोटर आयडी वाटले जाऊन मतदानासाठी लोकांना आणले जात आहे, त्याशिवाय भाजपकडून वोटिंग स्लिप दिल्या जात आहेत असा आरोप भगवा गार्ड यांच्याकडून करण्यात आला. त्यावर मतदान केंद्रावर आक्षेप घेण्यात आला आणि त्यानंतर स्थानिक आमदार मनीषा चौधरी त्यासोबतच भाजप पदाधिकारी यांच्यासोबत गोंधळ झाल्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला.

मुंबईच्या भांडुपमधील आदर्श नगर प्रभाग क्रमांक ११४ मध्ये शिंदे शिवसेना आणि ठाकरे शिवसेनेचे कार्यकर्ते पदाधिकारी मतदान केंद्रावर समोरासमोर आल्याचं पाहायला मिळालं. त्यांच्यात बाचाबाची झाली आणि गोंधळ उडाला, त्यानंतर आता पोलिसांकडून वातावरण शांत करण्यात आले.



**राज्य निवडणूक आयोगाची तातडीची पत्रकार परिषद**

राज्य निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना निवडणूक आयोगानं म्हटलं आहे की, शाई पुसली जात आहे, हा संभ्रम पसरवला जात आहे. २०११ पासून जी शाई वापरली जात आहे, त्याच शाईचा आताही वापर होत आहे. ही शाई आम्ही मार्कर पेनच्या स्वरुपात वापरत आहोत. त्यामुळे निवडणुकीमध्ये अशा पद्धतीचा संभ्रम पसरवणं हे चुकीचं आहे. याशिवाय विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीमध्ये देखील अशा तक्रारी आल्या होत्या. शाई ड्राय झाल्यानंतर ती पुसल्या जात नाही. कोरस कंपनीचा मार्कर पेन आम्ही वापरत आहोत. २०११ पासून आम्ही एकाच कंपनीचे पेन वापरत आहोत. हे आरोप चुकीचे आहेत, मतदारांची पूर्ण ओळख पटल्याशिवाय त्यांना मतदान करू दिलं जात नाही असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

## मतदानादिवशीच शिवसेनेच्या दोन उमेदवारांना अटक

**मुंबई :** मतदानाच्या दिवशीचशिंदेंना मोठा धक्का बसला आहे. नवी मुंबईत शिवसेनेच्या दोन उमेदवारांना पोलिसांनी अटक केली आहे. या करावाईमुळे नवी मुंबईत एकच खळबळ उडाली. रबाळे पोलिसांनी यांना ताब्यात घेतले आहे. अटक केलेले दोघेही पिता पुत्र आहेत. नवी मुंबईतील ऐरोली परिसरात शिवसेना उमेदवाराला अटक करण्यात आली आहे. एम के मढवी यांना त्यांच्या मुलासह अटक करण्यात आली आहे.

शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार एम के मढवी आणि त्यांचे सुपुत्र करण मढवी यांना रबाळे पोलीसांनी अटक केली आहे. ऐरोली मध्ये झालेल्या मारहाणी प्रकरणी रबाळे पोलीसांनी यांना अटक केली आहे. ऐरोली सेक्टर १६ मधील मंडळाच्या पोरांना मढवी कुटुंबियांनी मारहाण केली होती. याप्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार एम के मढवी, उमेदवार विनया मढवी आणि मुलगा करण मढवी वर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मतदानाच्या दिवशी अटक झाल्यानं खळबळ उडाली आहे. एम. के. मढवी, करण मढवी व विनया मढवी हे तिघेही शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार असून सध्या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. एम. के. मढवी प्रभाग क्रमांक ४ –ड, करण मढवी प्रभाग क्रमांक ५ तर, विनया मढवी प्रभाग क्रमांक ५–ड मधून निवडणुक लढत आहेत.

## पुण्यात एकाच दिवशी दोन दंगलीचे गुन्हे दाखल

**पुणे :** बृहन्मुंबई महापालिकेनंतर पुणे महापालिकेच्या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये पुण्यात काँटे की टक्कर होत आहे. प्रचारानंतरही दोन्ही पक्षांमध्ये प्रचंड संघर्ष दिसून आला. मतदानाला काही तास बाकी असताना आणि प्रत्यक्ष मतदान सुरू असताना पदाधिकाऱ्यांमध्ये हमरातुमरी झाल्याने एका दिवसात दोन दंगलीचे गुन्हे दाखल करण्यात आले.

पुण्यात प्रभाग क्रमांक ९ मध्ये एका दिवसात दोन दंगलीचे गुन्हे दाखल करण्यात आले. राष्ट्रवादीचे उमेदवार बाबूराव चांदेरे यांच्या सुनेला रात्री मारहाण झाली. बाणेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुरूवारी दुपारी प्रमोद निम्हण यांच्या कार्यकर्त्यांनी चांदेरे यांना बोगस मतदार आणल्याचा आरोप करत गाडी फोडल्याने दुसरा दंगलीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

पुण्यात प्रभाग क्रमांक ३३ मध्ये धायरी गावात तणावाचे वातावरण होते. पैसे वाटपावरून राडा झालेला पाहायला मिळाला. किशोर पोकळे आणि राहुल पाकळेंमध्ये मारहाण झाली. पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. प्रभाग क्रमांक २५ ड मध्ये राष्ट्रवादीचे बटण दाबल्यानंतर



मतदान होत नसल्याचा आरोप करण्यात आला. उमेदवाराने आक्षेप घेतल्यानंतर गोंधळ झालेला पाहायला मिळाला.

दुसरीकडे राष्ट्रवादीचे बटण दाबल्यानंतर भाजपाला मतदान होत असल्याचा आरोप झाला. शिवाजी मराठा हायस्कूल मधला हा प्रकार आहे.

## मुंबईला मिळणार भाजपचा महापौर?

### टाईम्स नाऊ, जनमत, लोकशाही रुद्र रिसर्च एक्झिट पोलचा अंदाज

**मुंबई :** महानगरपालिकेसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता सर्वात मोठा एक्झिट पोल समोर आला आहे. बहुतांश एक्झिट पोलमध्ये भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला स्पष्ट बहुमत मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर ठाकरेंना मात्र जोरदार धक्का बसणार असल्याचं सांगण्यात आलं आहे. त्यामुळे गेल्या २५ वर्षांपासून सत्तेत असलेल्या उद्धव ठाकरेंना हा धक्का असेल.

मुंबई महापालिकेसाठी जनमतचा एक्झिट पोल समोर आला आहे. त्यानुसार भाजप आणि शिंदे यांच्या युतीला १३८ जागा मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचवेळी ठाकरे बंधू आणि पवारांच्या राष्ट्रवादीला फक्त ६२ जागा मिळतील असं म्हटलंय. दुसरीकडे, काँग्रेस आणि वंचित आघाडीला २० जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्याचवेळी इतर पक्षांना ७ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. टाईम्स नाऊच्या एक्झिट पोलनुसार, मुंबईत भाजपची सत्ता येणार असून सर्वाधिक मतदान टक्काही त्या पक्षाला मिळणार आहे.



त्याचवेळी लोकशाही आणि रुद्र रिसर्च यांच्याही एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली आहे. या आकडेवारीनुसार, मुंबईत भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला १२१ जागा मिळतील. तर ठाकरेंच्या युतीला ७१ जागा मिळतील. काँग्रेस आणि वंचितच्या आघाडीला मुंबईत २५ जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

लोकशाही यांचाही एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली आहे. या आकडेवारीनुसार, मुंबईत भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला १२१ जागा मिळतील. तर ठाकरेंच्या युतीला ७१ जागा मिळतील. काँग्रेस आणि वंचितच्या आघाडीला मुंबईत २५ जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जेव्हीसी एक्झिट पोलनुसार, मुंबईत भाजपची सत्ता येणार असून सर्वाधिक मतदान टक्काही त्या पक्षाला मिळणार आहे.

## निकालापूर्वीच उद्धव ठाकरे अडचणीत?

**मुंबई :** आज महापालिका निवडणुकांसाठी मतदान सुरू आहे. मतदान सुरू असतानाच आज शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी निवडणूक आयोगावर आरोप केले आहेत.

मतदानाच्या दिवशी उद्धव ठाकरे पत्रकार परिषद घेत आहेत. या पत्रकार परिषदेला परवानगी होती का? असा थेट सवालच आशिष शेलार यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी निवडणूक आयोगावर बोट ठेवले. त्यांनी राजकीय भाष्य केलं का? उद्धव ठाकरे यांनी केलेले विधान पहावं लागेल, असं शेलार यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, लोकसभेला तेच, विधानसभेला तेच आणि आताही तेच, दुपारी दीड वाजेपर्यंत तीस टक्के मतदान झाले. अशावेळी ही आडकाठी का? गतिरोधक का? उद्धव ठाकरे प्रेस का घेतात यावर निवडणूक आयोगाने लक्ष ठेवायला हवं, अशी मागणी शेलार यांनी केली आहे.

त्यांनी यंत्रणांकडे तक्रार केल्याचं अद्याप समोर आलेलं नाहीये, उद्धव ठाकरे यांचा हा प्रचाराचा भाग आहे का? आमच्यावर टीका केली जाते. देवेंद्र फडणवीस यांच नाव घेतलं जातं. त्यामुळे आज मी इथे बोलतो आहे. नाहीतर मला देखील पत्रकार परिषद घेण्याची गरज नाही. उद्धव ठाकरे जे काही बोलले ते सर्व असत्य आहे, हा त्यांच्या बुद्धितीतील हेराफेरीचा प्रकार आहे. ही चोरी नाही. ठाकरे बंधूंच्या पक्षाचे सल्लागार सडके आणि ठाकरे बंधू रडके आहेत, असा घणाघात यावेळी आशीष शेलार यांनी केला आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## देशमुख कुटुंबियांच्या वतीने ॲड. आंबेडकरांचे स्वागत

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक - अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे आ. अमित देशमुख आणि देशमुख कुटुंबियांच्या वतीने बाभळगावच्या निवासस्थानी स्वागत करण्यात आले.

लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीतील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या सर्व उमेदवारांच्या प्राचारार्थ लातूर शहरातील छत्रपती राजर्षी शाहू महाराज चौकात दि. १३ जानेवारी रोजी प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या जाहीर प्रचार सभेसाठी लातूरला आलेले वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे बाभळगाव हेलिपॅडवर आगमन झाले. यानंतर ते आपल्या सहकाऱ्यांसमवेत देशमुख यांच्या बाभळगाव निवासस्थानी पोहोचले.

यावेळी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, प्रदेश काँग्रेस प्रवक्ते धिरज विलासराव देशमुख यांनी त्यांचे शाल, वृक्ष आणि 'असा घडला भारत' नामक ग्रंथ भेट देऊन स्वागत केले. यानंतर त्यांच्यात लातूर शहर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने विविध विषयांवर चर्चा पार पडली. यावेळी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस जितेंद्र देहाडे, सरचिटणीस भाऊसाहेब आजबे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विजय देशमुख, मंजुषाताई निंबाळकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



# 'द बर्निंग कार'चा अहमदपूर-किनगाव रस्त्यावर थरार; शिक्षकाचा जळून मृत्यू



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** गुरुवारी सकाळच्या सुमारास लातूर जिल्ह्यातील अहमदपूर-किनगाव रस्त्यावर 'द बर्निंग कार' चा थरार अनुभवायला मिळाला. हिप्परगा (कोपदेव) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक माधव श्रीवाड यांचा या घटनेत जाळून दुर्दैवी मृत्यू झाला.

अहमदपूर तालुक्यातील हिप्परगा (कोपदेव) येथील जिल्हा परिषद शाळेवर कर्तव्यावर असलेले शिक्षक माधव श्रीवाड यांना गुरुवारी (दि. १५ जाने.) रोजी सकाळच्या सुमारास शाळेतच छातीत दुखण्याचा त्रास सुरु झाला. त्यांना होणारा हा त्रास पाहून सहकारी शिक्षकांनी त्यांच्यासोबत रुग्णालयात येण्याची तयारीही दर्शविली. परंतु माधव श्रीवाड यांनी सहकाऱ्यांना काही हरकत नाही, आपण एकटेच रुग्णालयात जातो असे सांगून ते आपल्या कारमधून शाळेतून साधारणतः ११.३० ते १२.०० च्या सुमारास निघाले होते. अहमदपूरपासून अवघ्या पाच किमी अंतरावर असताना त्यांची कार रस्त्यालगतच्या पुलाला धडकली आणि गाडीने तात्काळ पेट घेतला. क्षणार्धात कार आगीच्या ज्वाळांनी वेढली गेली आणि माधव श्रीवाड यांचा जळून मृत्यू झाला. गाडी चालविताना त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका बसल्याने कदाचित त्यांचे कारवरील नियंत्रण सुटल्याने ती रस्त्यालगत आदळली आणि ही भीषण दुर्घटना घडली असण्याची शक्यता अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांनी व्यक्त केली. मयत शिक्षकाच्या कारचे रेसिंग जास्त झाल्याने ती क्षमतेपेक्षा अधिक गरम झाली असण्याची शक्यताही प्रत्यक्षदर्शींनी बोलून दाखविल्याचे विनोद मेत्रेवार यांनी सांगितले.

याप्रकरणी गुरुवारी उशिरापर्यंत अहमदपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. अचानक घडलेल्या या घटनेने अहमदपूर तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# जि.प., पं.स. निवडणुकीची अधिसूचना आज होणार प्रसिद्ध

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजी लातूर जिल्हा परिषद




आणि त्याअंतर्गत येणाऱ्या लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, अहमदपूर, उदगीर, जळकोट, निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी या १० पंचायत समित्यांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निवडणुकीची अधिसूचना १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध होणार असून ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होईल. तसेच ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक पथके स्थापन करण्यात आली आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांच्यासह प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून म्हणजेच १६ जानेवारी २०२६ ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार आहेत. मात्र, १८ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. या नामनिर्देशनपत्रांची छाननी २२ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. तसेच २३, २४ आणि २७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. २७ जानेवारी रोजी दुपारी ३.३० नंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे व चिन्ह वाटपाची कार्यवाही केली जाईल. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे, तसेच ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० पासून मतमोजणी केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली.

# शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट साठी डॉ. पुजा आष्टुरे यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** येथील एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील एम.पी.टी.एच. मस्सक्युलो स्केलेटल विषयातील व्दितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. पुजा रविंद्र आष्टुरे यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी नुकतीच निवड झाली आहे.



गेल्या एप्रिल २०२५ मध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी राज्यभरातील बी.पी.टी.एच. व एम.पी.टी.एच. फिजिओथेरपी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव मागवले होते. त्यामध्ये एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी संशोधन कार्यासाठी प्रस्ताव पाठवले होते. यामध्ये २५ पैकी एम.पी.टी.एच. व्दितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. पुजा आष्टुरे या विद्यार्थीनीच्या प्रस्तावाची १२ जानेवारी रोजी निवड करण्यात आली आहे.

येत्या डिसेंबर २०२६ पर्यंत सदरील संशोधन पुर्ण करुन ते महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे सादर करावयाचे आहे. या संशोधन कार्यासाठी एमयुएचएसकडून नऊ हजार आठशे एवढे विद्यावेतन मिळणार आहे.

या निवडीबद्दल डॉ. पुजा आष्टुरे यांचे एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य तथा मार्गदर्शक डॉ. सुभाष खत्री, विभाग प्रमुख डॉ. गौरव भटनागर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांतून अभिनंदन होत आहे.

# शहर मनपासाठी उत्स्फूर्त मतदान; आज मतमोजणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेसाठी गुरुवारी पार पडलेल्या मतदानास मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत शहरात एकूण ४३. ५८ टक्के एवढे मतदान झाले होते. प्रत्यक्ष मतदानाची वेळ टळून गेली असली तरी अनेक मतदान केंद्रावर मतदारांच्या मतदानासाठी रांगा असल्याने मतदानाची अंतिम आकडेवारी येण्यास रात्री उशीर होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. शुक्रवारी मतमोजणी होऊन निकाल घोषित होणार आहे.

लातूर शहर मनपाच्या या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे आ. अमित देशमुख आणि भाजपचे आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागली आहे. एकूण ७० जागांच्या या महापालिकेत ३६ हा बहुमतासाठी आवश्यक असणारा जादुई आकडा कोण गाठणार ? याकडे सगळ्यांचे





लक्ष लागले आहे. ही निवडणूक अपेक्षेप्रमाणे चुरशीची झाली. तिरंगी लढतीत नेमकी कोण बाजू मारणार ? या प्रश्नाचे उत्तर आत्ताच देणे धाडसाचे ठरणार आहे. कारण काँग्रेस, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने या निवडणुकीच्या प्रचारात चांगलीच आघाडी घेतल्याचे पाहायला मिळाले. प्रत्येकजण आपल्याच विजयाचा दावा करत असले तरी लातूरच्या सुजाण मतदारांनी कोणाच्या हातात मनपा च्या सत्तेची सूत्रे द्यायची? याची जाणीव न होऊ दिल्याने या निकालाबद्दल अनेकांना उत्सुकता आहे. शहराच्या काही प्रभागातील निकाल धक्कादायक लागतील असेही बोलले जात असल्याने प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांची धाकधूक बऱ्यापैकी वाढली आहे. भाजपच्या निष्ठावंत आघाडीकडेही अनेकांचे लक्ष लागले आहे.

शहरात सकाळच्या तसेच दुपारच्या सत्रात समाधानकारक मतदान झाले. मात्र, मतदानाच्या शेवटच्या दोन तासात अनेक मतदान केंद्रावर मतदानासाठी मतदारांच्या रांगा पाहायला मिळाल्या. त्यामुळे साडेपाच नंतरही अनेक मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया चालूच होती. त्यामुळे या मतदानाची निश्चित आकडेवारी रात्री उशिरापर्यंत कळू शकली नव्हती. परंतु एकंदर अंदाज पाहता हा आकडा साठ टक्क्यांच्या पुढे गेला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शुक्रवारी दुपारपर्यंत निकाल घोषित होणार आहेत. लातूर शहराच्या प्रभाग आठ मधील बालाजी मंदिर परिसरातील ९४ वर्षीय ज्येष्ठ नागरिक जुगलकिशोर गिल्डा यांनी आपले विधिज्ञ असलेले चिरंजीव तथा सामाजिक कार्यकर्ते संतोष गिल्डा यांच्यासमेवत येऊन शहरातील व्यंकटेश विद्यालयातील मतदान केंद्रावर मतदान करून मतदानाचा अधिकार बजावला.

## मुक्तांगणमध्ये मकर संक्रांती सण साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** लातूर येथील विशाल नगर परिसरातील साई मंदिर समोरील मुक्तांगण इंग्लिश स्कुलमध्ये मोठया उत्साहात मकर संक्रांती सण साजरा केला. यावेळी प्राचार्या सुमेरा शेख यांनी विठ्ठल रुक्मिणी आणि सरस्वती यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन केले.

या प्रसंगी शाळेच्या शिक्षिका प्रणिता सुरवसे यांनी मकर संक्रांती सणाची माहिती दिली. तिळ-गुळ घ्या गोड गोड बोला हा संदेश यादिवशी दिला जातो. शाळेचे शिक्षक, शिक्षिका यांनी ऐकमेकांना तिळगुळ देऊन शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे विद्यार्थी व पालकांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. सूत्र संचलन शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी केले.

# कर्करोग, डोळ्यांच्या तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी येथे श्री महादेव हनुमान अध्यात्मिक पीठ व रोटरी क्लब लातूर मिटाऊन स्वामी विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटल लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कर्करोग निदान शिबिर व डोळ्यांच्या तपासणी शिबिरास अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पाथरवाडीच्या श्री महादेव हनुमान अध्यात्मिक पीठच्या वतीने सातत्यानेअशा प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम राबविण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागातील रुग्णांच्या सोयीसाठी सदर शिबिराचे आयोजन केले गेले. या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते




दिलीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष अमोल दाडगे, पाथरवाडीचे सरपंच महेश सुडे, कर्करोग तज्ञ डॉ. बाजीराव जाधव, नेत्ररोग तज्ञ डॉ. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात एकूण २८० रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. नेत्र तपासणीत दोष आढळलेल्या ४५ रुग्णांना सोलापूर येथील नेत्र चिकित्सालय रुग्णालयात शस्त्रक्रियासाठी विनामूल्य घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात आली.

या शिबिरासाठी रमेश मद्दे, पंडितराव मुंढे, दगडू सोमवंशी, कमलाकर सूर्यवंशी, गोरख साळुंखे, जगदीश मद्दे, नवनाथ मद्दे, जगन्नाथ येमले, सौ. शोभा येमले इत्यादींनी परिश्रम घेतले.

# मुलींचा क्रिकेट संघ भुवनेश्वरकडे रवाना

## कु. गंगा कदम करणार नेतृत्व



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** अंध मुला-मुलींसाठी क्रिकेट खेळ विकासात सातत्याने कार्यरत असलेल्या क्रिकेट असोसिएशन फॉर दि ब्लाइंड इन इंडिया या संस्थेमार्फत दि. १७ ते २२ जानेवारी २०२६ दरम्यान भुवनेश्वर (ओरिसा) येथे अंध मुलींच्या सहाव्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत देशातील १८ क्रिकेट संघ सहभागी होणार आहेत. गट (इ) अंतर्गत क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड ऑफ महाराष्ट्रच्यावतीने अंध मुलींचा महाराष्ट्र क्रिकेट संघही या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत सहभागी होणार आहे. महाराष्ट्र क्रिकेट संघाचे नेतृत्व नुकताच नोव्हेंबर २०२५ मध्ये कोलंबो येथे विश्र्व कप जिंकलेल्या अंध मुलींच्या भारतीय क्रिकेट संघाची उपकर्णधार कु. गंगा संभाजी कदम ही करत आहे. तिच्या नेतृत्वाखाली १४ मुलींचा क्रिकेट संघ ज्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, लातूर, सोलापूर या जिल्ह्यांसह राज्याच्या विविध भागातील दृष्टी दिव्यांग मुली सहभागी आहेत. प्रशिक्षक दादाभाऊ कुटे व व्यवस्थापक तन्वी सालावकर यांच्या नेतृत्वाखाली दि. १४ जानेवारी २०२६ रोजी रेल्वेने मुंबईहून भुवनेश्र्वरकडे रवाना होत आहे.

भुवनेश्वरकडे रवाना होण्यापूर्वी या दृष्टी दिव्यांग मुलींसाठी चार दिवसीय क्रिकेट प्रशिक्षण शिबिर अशोक कामत, क्रिकेट अकॅडमी, घणसवली, मुंबई या मैदानावर दि. ११ ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये संपन्न झाले.

या संपूर्ण प्रक्रियेत क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड ऑफ महाराष्ट्र या राज्यातील क्रिकेट संस्थेचा मोलाचा वाटा असून संस्थेचे अध्यक्ष पंकज चौधरी, महासचिव डॉ. माधव गोरे व कोषाध्यक्ष तथा प्रशिक्षक दादाभाऊ कुटे हे सक्रियपणे सहभागी आहेत. या क्रिकेट संघास समाजाच्या विविधस्तरातून उत्तुंग यशासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनचा अनुकरणीय उपक्रम

## संक्रांतीनिमित्त ३००० कापडी पिशव्यांचे वाटप, प्लास्टिकमुक्त लातूर करण्यासाठी एक ठाम पाऊल

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** लातूर शहराला हरित, स्वच्छ आणि सुंदर बनवण्याचा ध्यास घेत आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन गेल्या २४१९ दिवसांपासून अविरतपणे कार्यरत आहे. कोणताही गाजावाजा न करता, सातत्य, समर्पण आणि समाजप्रेमाच्या जोरावर फाऊंडेशनने पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला नवे बळ दिले आहे.

प्रत्येक सण केवळ परंपरेपुरता न साजरा करता, नवीन्यपूर्ण आणि समाजोपयोगी उपक्रमांतून साजरा करणे ही आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनची ओळख बनली आहे. याच परंपरेला पुढे नेत, मकरसंक्रांतीच्या पवित्र सणानिमित्त आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनच्या सन्माननीय महिला सदस्यांनी एक अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम हाती



घेतला आहे.

संक्रांतीला वाण देण्याच्या परंपरेला पर्यावरणपूरक वळण देत, यंदा ३००० कापडी पिशव्या नागरिकांना वाटप करण्यात येणार आहेत. प्लास्टिक पिशव्यांच्या अनिर्बंध वापरामुळे होणारे पर्यावरणीय नुकसान, नाले तुंबणे, जनावरांचे मृत्यू आणि मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता, हा उपक्रम अत्यंत काळाची गरज ठरत आहे.

फाऊंडेशनच्या महिला सदस्यांनी घेतलेले हे छोटेसे पण अर्थपूर्ण पाऊल लातूर शहराला प्लास्टिकमुक्त करण्याच्या दिशेने एक मजबूत पायाभरणी ठरणार आहे. घराघरात पोहोचणारी ही कापडी पिशवी केवळ वस्तू नसून, ती पर्यावरण संवर्धनाचा जिवंत संदेश आहे.

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, महिलांचा सक्रिय सहभाग. पर्यावरण रक्षण ही केवळ संस्था किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाची विशेषतः महिलांची महत्त्वाची भूमिका आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित होते. सर्वांचे अभिनंदन आणि मनःपूर्वक आभार.

ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनच्या या प्रेरणादायी कार्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी सातत्याने झटणाऱ्या सर्व सदस्यांचे, विशेषतः महिला सदस्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

लातूर शहरासाठी, पर्यावरणासाठी आणि भावी पिढीसाठी झटणारे आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन खरोखरच समाजासाठी एक आदर्श ठरत आहे अशा भावना आमच ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन च्या ॲड वैशाली यादव यांनी बोलून दाखवल्या.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये मकरसंक्रांत उत्साहात




**बिडकीन :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये मकरसंक्रांती हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता तोतला तसेच शाळेच्या पर्यवेक्षिका वर्षा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मकरसंक्रांती सणाचे महत्त्व व परंपरा याबाबत माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना पतंग उडवताना काळजी घेण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. नायलॉन मांजा वापरू नये, तसेच पक्षी, नागरिक व स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करण्याचा संदेश दिला.

### शाळा उभारणी उपक्रमाची घोषणा

**नाशिक :** हॅबिल्ड या भारतातील पहिल्या उत्तम सवय अंगी बाणवणाऱ्या प्लॅटफॉर्मने एका दिवसात मोस्ट योग व्ह्यूवरशीपसाठी अधिकृतरित्या जागतिक विक्रम रचला आहे. जे वर्ल्ड रेकॉर्डस युनियनने प्रमाणित केले आहे. दिवसभरात घेण्यात आलेल्या सहा लाइव्ह ऑनलाइन योग सत्रांच्या माध्यमातून हा विक्रम संपादित करण्यात आला. जेथे सर्व सत्रांमधील एकूण उपस्थित सहयोगींची एकत्रित गणना करण्यात आली. या उपक्रमाला जगभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ज्यामध्ये ९.३लाख व्यक्ती सहभागी झाले होते. हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यासह हॅबिल्डने शाळा उभारणी उपक्रमाची देखील घोषणा केली. या उपक्रमामध्ये सहभाग घेणाऱ्या प्रत्येक नवीन सहभागीसह या शाळेच्या बांधकामासाठी एक विट दान करण्यात येईल. हॅबिल्डच्या हर घर योगा उपक्रमाचा भाग म्हणून हा विक्रम संपादित करण्यात आला.

### डेटा-चालित सौर डिझाइनसह अपघात-प्रवण महामार्गांवर प्रकाश

**मुंबई :** लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने विजयवाडा प्रदेशातील प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर फेज १ अंतर्गत रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने ओळखलेल्या १०४ अपघात-प्रवण आणि ब्लॅक स्पॉट ठिकाणी सौर महामार्ग प्रकाश बसवण्याचे कंत्राट दिले आहे. स्पर्धात्मक व्यावसायिक बोली प्रक्रियेनंतर, लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेड, सिग्निफाय इनोव्हेशन्स इंडिया लिमिटेड (पूर्वी फिलिप्स लाइटिंग इंडिया लिमिटेड) सोबत भागीदारीत, प्रकल्पाचे सर्वेक्षण, डिझाइन, उत्पादन आणि अंमलबजावणी करण्यासाठी यशस्वी बोलीदार म्हणून उदयास आले.

### 'एसबीआय लाईफ - स्मार्ट प्लॅटिना ॲडव्हान्टेज'

**मुंबई :** आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात-जिथे महत्त्वाकांक्षा वाढत आहेत आणि जबाबदाऱ्याही तितक्याच वाढत आहेत-आर्थिक सुरक्षितता ही केवळ पैशांपुरती मर्यादित राहिलेली नाही. ती आता निश्र्चितता, मानसिक शांतता आणि आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्या प्रियजनांचे संरक्षण करण्याची क्षमता यांशी जोडलेली आहे. ही गरज ओळखून, भारतातील सर्वाधिक विश्र्वासार्ह खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाईफ इन्शुरन्सने 'एसबीआय लाईफ-स्मार्ट प्लॅटिना ॲडव्हान्टेज' ही वैयक्तिक, नॉन-लिंक्ड, नॉन-पार्टिसिपेटिंग जीवन विमा बचत योजना सुरू केली आहे. ही योजना पॉलिसी कालावधीभर जीवन विमा संरक्षणासोबतच दीर्घकालीन हमी लाभ प्रदान करते.

### ॲमेझॉन इंडियाचा ग्रेट रिपब्लीक डे २०२६ सेल

**छत्रपती संभाजीनगर :** ॲमेझॉन इंडियाचा फार प्रतिक्षेत असणारा ग्रेट रिपब्लीक डे सेल २०२६, १६ जानेवारीपासून रात्री १२ वाजता लाईव्ह होणार आहे. या शॉपिंग इव्हेंटमध्ये स्मार्टफोन, फॅशन, सौंदर्य उत्पादने, घर आणि स्वयंपाकघर, ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स, लार्ज अप्लायंसेस, किराणा, दैनंदिन गरजेच्या वस्तू आणि बऱ्याच श्रेणींमध्ये आकर्षक नवीन उत्पादने आणि उत्तम ऑफर्स एकत्र उपलब्ध आहेत. ग्राहक ॲपल, सॅमसंग, वनप्लस, सोनी, एलजी, स्केचर्स, लॉरेल पॅरिस,आयक्यू, शाओमी, क्युबा, टीसीएल, एचपी आणि बोट यांसारख्या अनेक अग्रेसर ब्रँड्सची उत्पादने शोधू शकतात. ट्रेंडिंग डील्स, ८पीएम डील्स, सर्वोत्तम ७७ रिपब्लिक डील्स आणि सर्वोत्तम १०० डील्स यांसारख्या खास निवडक डील फॉरमॅटमधूनही ग्राहक खरेदी करू शकतात. पोंगल, मकर संक्रांती, माघ बिहू आणि उत्तरायण यांसारख्या सणांसाठी खास निवडलेली उत्पादने, तसेच अग्रेसर ब्रँड्सच्या सणासुदीच्या आवश्यक वस्तू आणि भेटवस्तूंचे आवडते पर्याय यांमुळे 'ग्रेट रिपब्लिक डे सेल' मध्ये खरेदी करणे सोपे बनते.

### अजिंठा लेणीच्या पायथ्याशी भरली जत्रा

**फर्दापूर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी च्या पायथ्याशी दरवर्षी प्रमाणे यंदाही एकदिवसीय जत्रेत बालगोपाल लहान मुलांनी आनंद घेतला. मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी हि जत्रा भरते हि जत्रा पाहण्यासाठी फर्दापूर, ठाणा, वरखेडी, ठाणा, अजिंठा, सारखेडा, लेणापूर, पळसखेडा येथून पालक आपल्या मुलांना घेऊन जत्रेत येतात. या एकदिवसीय जत्रामध्ये मुलं मोठ्या प्रमाणात आनंद घेऊन जातात. या जत्रेत देशी विदेशी पर्यटकांना हि जत्रा पाहून मोठा आनंद होतो

### कमांड मॅक्ससह ऑल-न्यू टाटा पंच

**मुंबई :** टाटा मोटर्स पॅसेंजर वेईकल्स लि. (टीएमपीव्ही) या भारतातील आघाडीच्या कार्स व एसयूव्ही उत्पादक कंपनीने आज भारतातील सर्वात लोकप्रिय एसयूव्ही नवीन, अधिक गतीशील, अधिक स्मार्ट आणि अधिक आकर्षक लुकमध्ये लाँच करण्याची घोषणा केली. नवीन टाटा पंचमध्ये तिच्या अद्वितीय सिग्नेचर 'कमांड मॅक्स' अंतर्गत अद्वितीय शक्ती, अधिक आरामदायीपणा, अत्याधुनिक तंत्रज्ञान व शक्तिशाली स्टायलिंगचे संयोजन आहे. नवीन टाटा पंच फक्त ५.५९ लाख रूपयांच्या (एक्स-शोरूम, नवी दिल्ली) सुरूवातीच्या किमतीमध्ये उपलब्ध आहे.

### इकबाल खान डॉ. देव च्या रूपात दिसणार

**मुंबई :** भारताची आघाडीची हिंदी जनरल एन्टरटेन्मेंट चॅनल सोनी सब घेऊन येत आहे एक भावनात्मक, मेडिकल मालिका- 'हुई गुम यादें - एक डॉक्टर, दो जिंदगियां'. जगातील अनेक देशांमधील वेगवेगळ्या भाषांमध्ये रूपांतरित झालेल्या आणि जगभरात वाखणल्या गेलेल्या डीओसी या इटालियन मेडिकल ड्रामाचे हे भारतीय रूपांतर आहे. या मालिकेत अभिनेता इकबाल खान डॉ. देव मेहता या मध्यवर्ती भूमिकेत दिसणार आहे. डॉ. देव मेहता अत्यंत कुशल डॉक्टर आहे.

### अमृत चौधरी जावळे यांचे निधन

**सोयगाव :** भवानीपुरा येथील अमृत रघुनाथ चौधरी (जावळे) (वय.६५) यांचे दिर्घ आजाराने दि.१४ बुधवार रोजी सकाळी ८:३५ वाजता निधन झाले. त्यांचेवर बुधवार रोजी सायंकाळी ५:३० वा.त्यांच्या शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुला, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. योगेश जावळे चौधरी यांचे ते चुलत भाऊ होत.



# सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आजपासून संभाजीनगर जिल्हा दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १५ :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूजनीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत हे दिनांक १६ व १७ जानेवारी २०२६ रोजी दोन दिवसीय अधिकृत दौऱ्यावर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात येत असून, या दौऱ्यात विविध रणनीतिक, वैचारिक व समाजाभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्र्वभूमीवर हा दौरा वैचारिक संवाद, युवा सहभाग आणि समाजघटकांशी समन्वय साधण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर शहरातील 'युवा संमेलनात' पू. सरसंघचालकांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या संमेलनामध्ये भारतीय संस्कृती, राष्ट्रीय स्वावलंबन तसेच समकालीन सामाजिक विषयांवर सुसंवादी व दिशादर्शक विचारमंथन होणार आहे. हा कार्यक्रम चखढ कॉलेजच्या मागील बाजूस असलेल्या मंथन सभागृहात सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत विशेष आमंत्रितांसाठी आयोजित करण्यात आला आहे.

त्याच दिवशी सायंकाळी गंगापूर येथे आयोजित हिंदू संमेलनात पू. सरसंघचालक समाजाला मार्गदर्शन करणार आहेत. हिंदू समाजातील विविध घटकांनी संघटित, समन्वित व सक्रिय सहभाग घ्यावा, या



उद्देशाने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. समाजप्रबोधन, संस्कृती संरक्षण आणि राष्ट्रभक्ती या मूलभूत मूल्यांवर आधारित विचार या संमेलनातून मांडले जाणार आहेत. हा कार्यक्रम गंगापूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर पूजनीय संतांच्या उपस्थितीत सायंकाळी ५.०० वाजता सुरू होणार आहे.

दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त (१९२५-२०२५) छत्रपती संभाजीनगर शहरात विशेष आमंत्रितांसाठी 'युवा उद्यमी संवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजजीवनातील प्रभावशाली व्यक्ती, युवा उद्योजक आणि नेतृत्वक्षम घटकांशी थेट संवाद साधणे, विचारांची देवाण-घेवाण करणे आणि अनुभवाधारित मार्गदर्शन देणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. हा कार्यक्रम समर्पण कार्यालय, चखढ कॉलेजजवळ सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत पार पडणार आहे. यानंतर सायंकाळी ४.०० वाजता विशेष आमंत्रित व्यक्तींसाठी प्रमुख जनसंगोष्ठी आयोजित करण्यात आली असून, यामध्ये समाजाचे दिशादर्शक व सन्माननीय व्यक्तिमत्त्व सहभागी होणार आहेत. या मंचावर पू. सरसंघचालक त्यांच्याशी सखोल संवाद व चर्चेद्वारे समकालीन सामाजिक विषयांवर मार्गदर्शन करतील. हा दौरा संघटनात्मक दृष्टिकोनातून तसेच समाजाशी प्रभावी संवाद साधण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार आहे.

## बिडकीन येथे जिजाऊ जन्मोत्सवनिमित्त रथयात्रा

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि १५ :** राजमाता जिजाऊ यांनी बाल शिवरायांच्या मनात रयतेचे राज्य साकारण्याचे स्वप्न रुजवले आणि ते प्रत्यक्षात आणण्यासाठी स्वतःचे प्राण तळहातावर घेतले. त्यामुळे जिजामातांना केवळ 'राजमाता' म्हणून मर्यादित न करता त्यांना क्रांती नायिका म्हणून ओळखले पाहिजे, असे सडेतोड प्रतिपादन विचारवंत व कवयित्री प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे यांनी केले.बिडकीन येथे राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सोमवारी (दि. १२) आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

छावा महाराष्ट्र सेनेचे मराठवाडा प्रमुख मनोज मुरदारे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त गावातून प्रभात फेरी काढण्यात आली तसेच जिजाऊंच्या प्रतिमेची भव्य रथयात्रा निघाली. या रथयात्रेत महिला, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर प्रा.डॉ.अहिरे यांचे व्याख्यान झाले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्र्वारूढ पुतळ्यास क्रेनद्वारे प्रा.अहिरे व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मयुरी दुबे, जान्हवी नरवडे, ऋतिक नरवडे, तेजस्विनी गाडेकर, प्रेरणा कुमावत या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. मंचावर माजी जि.प.सदस्या शिलाताई चव्हाण, माजी सरपंच सारिका पेरे, नूतन शिंदे, ज्योती मुरदारे, शितल शेळके, अंजली गोर्डे उपस्थित होत्या.

जन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी छावा महाराष्ट्र सेनेचे संघटना प्रमुख किशोर शिरवत, सरपंच अशोक धर्मे, माजी जि प सदस्य विजय चव्हाण, मनोज पेरे, काकासाहेब टेके, उपसरपंच किरण गुजर, मधुकर सोकटकर, विकास गोर्डे, जालिंदर एरंडे, विजय शेळके, धनंजय चिरेकर, संतोष कुशेकर, विलास औटी, सचिन जोशी, नारायण नरवडे, डॉ.दिपक गायकवाड, राजु मते, नरहरी उबाळे, आदित्य घुले, रोहण काळे आदी उपस्थित होते.

## जटवाडा येथे होणार पंचामृत अभिषेक महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १५ :** श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे १८ जानेवारी रविवारी रोजी आर्यिका सौभाग्यमती माताजी याचा सानिध्यात सकाळी १० वाजता मुलनायक श्री. संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक व णमोकार भक्ती मंडळचा साग्रसगीतात अभिषेक करण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस अशोक कुमार स्व राजकुमार शरदकुमार के अजितकुमार गगवाल परीवार वाकलावाला छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे.



अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे. तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्थ मंडळाने केले आहे.

## 'ज्ञानेश्वर'च्या विष्णू भोईने पटकाविले रौप्य पदक




**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.१५ :** सेगा युनिव्हर्सिटी भोपाल येथे पार पडलेल्या साउथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी मेन वेटलिफ्टिंग टूर्नामेंट २०२५-२६ या स्पर्धा १२ जानेवारी ते १५ जानेवारी २०२६ दरम्यान यशस्वीपणे संपन्न झाल्या. या स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा संघ सहभागी झाला होता.संघातील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा विद्यार्थी विष्णू भोई याने ११० किलो वजन गटात एकूण ३०५ किलो वजन उचलून रौप्य (सिल्वर) पदक पटकावले. तसेच ६० किलो वजन गटात रुपेश सेन याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ८ वे स्थान मिळवले.

या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर विष्णू भोई व रुपेश सेन या दोन्ही खेळाडूंची ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली असून ही बाब विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.या संघाला प्रशिक्षक तुषार सपकाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विजय फुलारी, प्रो-कुलगुरू डॉ.वाल्मीक सरोदे, प्रभारी क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख, जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष राजू वैद्य, सचिव दिपक रुईकर, प्रा भाऊसाहेब खरात, डॉ.अभिजीत दिख्खत, डॉ. हाश्मी, सुरेंद्र मोदी, गणेश कड, मोहन वाहिलवार, रामेश्वर विधाते आदींनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## पतंग उडवताना सुरक्षितता बाळगा : डॉ. टाकळकर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १५ :** मकरसंक्रांतीच्या काळात पतंग उडवण्याचा उत्साह वाढत असताना नायलॉन मांजामुळे होणाऱ्या अपघातांमध्ये चिंताजनक वाढ होत असल्याचे निरीक्षण समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी नागरिकांना सुरक्षिततेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे.

डॉ. टाकळकर यांनी सांगितले की, अलीकडच्या काळात रुग्णालये व क्लिनिकमध्ये नायलॉन मांजामुळे गळ्यावर खोल जखमा, हातांवर गंभीर चिरा तसेच चेहऱ्यावर रक्तस्रावाच्या घटना मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. काही प्रकरणांमध्ये तातडीने शस्त्रक्रिया किंवा टाके घालण्याची वेळ येत असून, काही सेकंदांचा विलंबही जीवघेणा ठरू शकतो.



दुचाकीस्वारांसाठी नायलॉन मांजा हा मोठा धोका असल्याचे नमूद करत त्यांनी फुल फेस हेल्मेटचा वापर, वेग मर्यादित ठेवणे आणि शक्य असल्यास गळ्याभोवती स्कार्फ वापरण्याचा सल्ला दिला. तसेच अहमदाबाद पॅटर्नप्रमाणे दुचाकीवर उलट्या 'ण' आकाराचा पातळ मेटल रॉड बसवण्याची सूचना केली.

पालकांनी आपल्या मुलांना नायलॉन मांजा वापरण्यास परवानगी देऊ नये तसेच दुकानदारांनीही असा मांजा विकू नये, ही सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पतंग उडवा, आनंद घ्या; पण कोणाच्या आयुष्याची दोरी कापू नका. नायलॉन मांज्याला पूर्ण नकार देऊन सुरक्षित दोरीच वापरा, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.

## युनियन बँक ऑफ इंडियाची तिसऱ्या तिमाहीत उल्लेखनीय कामगिरी

**मुंबई :** सार्वजनिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या युनियन बँक ऑफ इंडियाने आर्थिक वर्ष २०२५ - २६ च्या तिसऱ्या तिमाहीत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अत्याधुनिक ग्राहक सेवा देत ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यामुळे बँकेला ५०१७ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळाला असल्याची माहिती बँक प्रशासनाने दिली. बँकेचा एकूण व्यवसाय २२.३९ लाख कोटींच्या पुढे गेला आहे. सातत्यपूर्ण वाढ आणि मालमत्ता गुणवत्तेतील सुधारणा यामुळे ही प्रगती साध्य झाल्याचे बँकेने स्पष्ट केले.



३१ डिसेंबर २०२५ रोजी समाप्त झालेल्या तिमाहीत बँकेचा नफा मागील तिमाहीच्या तुलनेत १८.०७ टक्क्यांनी वाढलेला आहे. या कालावधीत बँकेचा ऑपरेटिंग नफा ६,९४२ कोटी इतका राहिला, तर निव्वळ व्याज उत्पन्न ५.८५ टक्क्यांनी वाढून ९,३२८ कोटींवर पोहोचले. कार्यक्षमता निर्देशांकातही सुधारणा दिसून आली असून, निव्वळ व्याज मार्जिन २.७६ टक्के, मालमत्तेवरील परतावा १.३५ टक्के आणि भागधारक भांडवलावरील परतावा १७.०९ टक्के इतका नोंदवण्यात आला आहे. देशांतर्गत सीएएसए गुणोत्तर ३३.९६ टक्क्यांवर स्थिर राहिले असून, कमी खर्चाच्या ठेवींवर बँकेचा भर कायम असल्याचे यावरून स्पष्ट होते.

किरकोळ, कृषी व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रांवर बँकेचा धोरणात्मक भर कायम असून देशांतर्गत एकूण कर्जपुरवठ्यात या क्षेत्रांचा वाटा ५८.८४ टक्के इतका आहे. किरकोळ कर्जपुरवठ्यात वर्षभरात २१.६७ टक्क्यांची वाढ झाली असून गृहकर्ज व वाहन कर्ज यामुळे ही वाढ साध्य झाली आहे. तसेच चडचए क्षेत्रातील कर्जपुरवठा १९.७५ टक्क्यांनी वाढला आहे.

मालमत्ता गुणवत्तेच्या बाबतीत बँकेने दहा वर्षांतील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे. एकूण अनुत्पादित कर्जे ३.०६ टक्क्यांवर आली असून, नेट छझ- केवळ ०.५१ टक्के इतकी राहिली आहे. प्रोव्हिजन कव्हरेज रेशो ९५.१३ टक्क्यांपर्यंत वाढला असून बँकेच्या जोखीम व्यवस्थापनाची ही सकारात्मक बाब मानली जात आहे.

## रस्ता सुरक्षा शिक्षणात तरुणांना सहभागी करून घेतले

**तभा.वृत्तसेवा**

**अहमदनगर, दि.१५ :** होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया ने आपल्या देशव्यापी रस्ता सुरक्षा उपक्रमाला पुढे नेत अहमदनगर, महाराष्ट्र येथे जनजागृती मोहिम राबवली. या मोहिमेत श्री वीरभद्र विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा आणि संत जनार्दन स्वामी (मौंगिरी) महाराज महर्षी स्कूल येथील २४०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग झाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांसाठी शिकण्याचे, संवाद साधण्याचे आणि रस्त्यावर सामायिक जबाबदारी स्वीकारण्याचे खुले व्यासपीठ निर्माण करण्यात आले.या मोहिमेचा उद्देश रस्त्यावरचे वर्तन प्रत्यक्षात समजून घेणे हा होता. संरचित सत्रांद्वारे सहभागी विद्यार्थ्यांना सुरक्षित वाहनचालक पद्धतींची मूलतत्त्वे, वाहतूक शिस्तीचे महत्त्व आणि दैनंदिन प्रवासात जागरूकतेची भूमिका यांची ओळख करून देण्यात आली.

या सत्रांमधून सहभागींच्या मनात रस्ता सुरक्षा ही केवळ नियमांची अंमलबजावणी नसून, दररोजची सवय आहे जी वैयक्तिक तसेच सामूहिक कल्याणावर प्रभाव टाकते, अशी जाणीव निर्माण करण्यात आली.

## भारतीय बहुउद्देशीय पत्रकार संघाची गंगापूर तालुक्याची नूतन कार्यकारिणी जाहीर

**गंगापूर :** भारतीय बहुउद्देशीय पत्रकार संघाची बैठक बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी पंचायत समिती सभागृहात पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान प्रदेशाध्यक्ष विजय बन्सोड यांनी भूषविले. यावेळी प्रदेश सचिव अयुब पटेल, मराठवाडा अध्यक्ष अलिम चाऊस, जिल्हाध्यक्ष शिवप्रसाद बन्सोड तसेच जिल्हा सचिव इब्राहिम शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. २०२६ साठी गंगापूर तालुक्याची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये बाळासाहेब वाघमारे यांची तालुकाध्यक्षपदी तर तालुका सचिव म्हणून लक्ष्मीकांत माघाडे यांची निवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना प्रदेशाध्यक्ष विजय बन्सोड व प्रदेश सचिव अयुब पटेल यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष-बाळासाहेब वाघमारे उपाध्यक्ष- गिरीष गंगापूरकर, फिरोज मन्सुरी, बापू सोमासे सचिव-लक्ष्मीकांत माघाडे सहसचिव- सदाशिव जंगम, चंद्रकांत जाधव कार्याध्यक्ष- गुलाब वाघ सहकार्याध्यक्ष-अमर बाशवान प्रसिद्धी प्रमुख-विशाल जोशी, संघटक- सुनील झिंजुर्डे सहसंघटक- गणेश म्हैसमाळे, सदस्य- धनंजय ठोंबरे, जमील पठाण, अमोल पारखे, गणेश साळुंके, अमोल आळंजकर, दत्तात्रय जोशी, रशिद शहा यांचा समावेश आहे.

### जाहीर प्रगटन

ॲडवोकेट डि.ई. पानकडे ९५९५६६६६२२
दि.१५/०१/२०२६

**(मौजे गुरुधानोरा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथील गट नं. ५४/१ मधील १ हे. २० आर जमीनीबाबत आक्षेप)**

माझे पक्षकार रामकिसन सुभाष ढोले रा. टेंभापूरी, छ. संभाजीनगर ता.जि. छ. संभाजीनगर यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांची मौजेगुरुधानोरा येथील गट नं. ५४/१ मध्ये ८० आर जमीन असून सदर जमीनीत जाण्यायेण्याठी पूर्व-पश्चिम असा सदर गटातील रविंद्र एकनाथ राऊत, सुवर्णा रविंद्र राऊत व बाबासाहेब एकनाथ राऊत सर्व रा. वाळुज बु. ता. गंगापूर यांच्या प्रत्येकी ४० आर जमीनीच्या उत्तर बाजूने रस्ता आहे.असे की, मौजे गुरुधानोरा ता. गंगापूर येथील गट नं. ५४/१ मधील क्षेत्र ०२ हे. ०२ आर हे पूर्वीचे मालक सतिष वैजीनाथ भवर रा. लिंबेजळगांव यांच्या मालकी व ताब्यात होती व त्यांच्याकडून माझे पक्षकार यांनी सदर जमीन ही खरेदीखत क्रमांक ५५४८/२०१७ दिनांक ०७/१२/२०१७ नुसार खरेदी केली आहे व त्यावेळी शिल्लक राहीलेल्या ३ एकर जमीनीतून उत्तर बाजूने माझे पक्षकारास त्यांच्या जमीनीत जाण्यायेण्यासाठी गाडीरस्ता ठेवण्यात आलेला आहे व तेव्हापासून माझे पक्षकार हे सदर गाडीरस्त्याचा वापर आपल्या शेतात जाण्यायेण्यासाठी करत आहेत. सदर सतिष भवर यांची शिल्लक राहीलेली जमीन ३ एकर ही रविंद्र एकनाथ राऊत, सुवर्णा रविंद्र राऊत व बाबासाहेब एकनाथ राऊत यांनी प्रत्येकी ४० आर प्रमाणे खरेदी केली असून त्यांनी खरेदी करतेवेळी त्यांना सदर माझे पक्षकार यांना असलेल्या रस्त्याची पूर्ण कल्पना देवून जमीन सतिष भवर यांनी विक्री केली आहे.व रस्त्याच्या क्षेत्राचा तुकडा होवू नये व तूकडेबंदी कायदयाचा भंग होवू नये या उद्देशाने शिल्लक संपूर्ण ३ एकर जमीनीचे पत्येकी ४० आर जमीनीचे खरेदीखत हे रविंद्र एकनाथ राऊत, सुवर्णा रविंद्र राऊत व बाबासाहेब एकनाथ राऊत यांच्या हक्कात करून देण्यात आलेले होते. मात्र सदर जमीन ही आज रोजी माझे पक्षकार यांच्या ताब्यात व वहिवाटीत असून त्यांनी चालू वर्षी सदर संपूर्ण ५ एकर जमीनीमध्ये उसाची लागवड केलेली आहे. मात्र, आता तिघेही सदर जमीन ही रस्त्यासह विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याचे माझे पक्षकार माहिती मिळालेली आहे. तरी सदर जाहिर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, कुणीही रविंद्र एकनाथ राऊत, सुवर्णा रविंद्र राऊत व बाबासाहेब एकनाथ राऊत यांच्याशी मौजे गुरुधानोरा ता. गंगापूर येथील गट नं. ५४/१ मधील प्रत्येकी ४० आर जमीनीचा म्हणून एकुण ३ एकर जमीनीचा व्यवहार हा माझ्या पक्षकार यांच्यासाठी असलेल्या रस्त्यासह करू नये व केल्यास सदर व्यवहार हा माझे पक्षकार यांच्यावर बंधनकारक राहणार नाही व माझे पक्षकार हे संबंधीताविरूद्ध योग्य ती कायदेशीर कार्यवाही करतील. करिता हे जाहिर प्रगटन.

**जाहिर प्रगटन देणार तर्फे**
**ॲड. दत्ता एकनाथराव पानकडे**
**मो.९५९५६६६६२२, ८२७५३२३१७०**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए. क्र. ३९ / २०२६
प्रकरणात पुढील तरीख दि. २०/०३/२०२६
अर्जदार:-१) नाथा गोपिनाथ पदार, वय ६६ वर्ष, धंदा शेती, रा. पखोरा ता. गंगापुर जि. छ. संभाजीनगर, २) सुमनबाई गंगाधर ठोंबरे, वय ७५ वर्ष, धंदा घरकाम, रा. जामगांव ता. गंगापुर जि. छ. संभाजीनगर, ३) हरणाबाई रामभाऊ डोळस, वय ८० वर्ष, धंदा घरकाम,
रा. मालुंजा ता. गंगापुर जि. छ. संभाजीनगर
//विरूध्द//
गैरअर्जदार: सिताबाई बस्तीराम पाठे, वय ६० वर्ष, धंदा घरकाम,रा. पखोरा ता. गंगापुर जि. छ. संभाजीनगर
प्रकरण :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये
लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. बी. पदार गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामीअर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ ते ३ व गैरअर्जदार हे वर नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असुन अर्जदार क १ ते ३ व गैरअर्जदार हे आपसात नात्याने सख्खे भाऊ व विवाहीत बहिनी आहेत. अर्जदार क १ ते ३ व गैरअर्जदार यांची आई नामे ठकुबाई गोपिनाथ पदार हि दि. १५/०३/२०१९ रोजी मौजे पखोरा ता. गंगापुर
जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. मयत ठकुबाई गोपिनाथ पदार यांचे पति म्हणजेच अर्जदार क १ ते ३ व गैरअर्जदार यांचे वडील नामे गोपिनाथ मारुती पदार हे पुर्वीच मयत झालेले आहे. मयतांना अर्जदार क १ हा मुलगा व अर्जदार क २ व ३ आणि गैरअर्जदार हया विवाहीत मुली कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. प्रस्तुत प्रकरण दाखल करण्यास गैरअर्जदार हि येत नसल्याने व ती देखील वारस असल्याने आवश्यक पक्षकार असल्याने तिला प्रस्तुत अर्जात गैरअर्जदार म्हणुन समाविष्ठ केलेले आहे. मयत ठकुबाई गोपिनाथ पदार यांना अर्जदार व गैरअर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहे.अर्जदार व गैरअर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत ठकुबाई गोपिनाथ पदार यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन दिले. आज दि. १४/०१/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून**
**लिपिक, सहाय्यक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## अग्रलेख...

# 'दहा मिनिटांना' चाप स्वागतार्हच...

दारावरची बेल वाजते... घड्याळात पाहताच दिसते की बरोबर ९ मिनिटे ५० सेकंद झालेली आहेत... बाहेर एक विशी-पंचविशीचा तरुण उभा असतो, ज्याला दम लागलेला आहे. कपाळावर घामाच्या धारा... आणि डोळ्यांत वेळेत पोहोचल्याचे समाधान नव्हे, तर वेळेत पोहोचलो नसतो तर काय घडले असते, याची एक अनामिक भीती आहे..! घरातून आलेली व्यक्ती कौतुकाने म्हणते, ''व्वा...किती फास्ट सर्व्हिस आहे रे..''!

पण त्याचवेळी शहराच्या दुसऱ्या कुठल्या तरी कोपऱ्यात याच वेगाच्या शर्यतीत एखादा तरुण ट्रकखाली चिरडला जात असतो किंवा कायमचा अपंग झालेला असतो. चहापत्ती, बिस्किटं किंवा शॅम्पूच्या एका बाटलीसाठी कुण्या माउलीच्या या रक्तामांसाच्या गोळ्याला मृत्यूच्या दाढेत ढकलणारी ही '१० मिनिटांची डिलिव्हरी' खरंच प्रगतीचे सूचक आहे का? वेगाच्या या अनावश्यक, अमानवीय स्पर्धेला केंद्र सरकारने आता लगाम घातला, हे खूप चांगले झाले. तुमच्या त्या १० मिनिटांच्या 'युनिक सेलिंग पॉईंट'साठी कोणाच्या घराचा दिवा विझवायचा का? असा प्रश्न ब्लिंकिट, झेप्टो, स्विगी, इन्स्टामार्ट आणि झोमॅटो यासारख्या कंपन्यांना विचारून सरकारने सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्याचे स्वागतच केले पाहिजे. हल्ली वेगाची स्पर्धा जीवनाच्या साऱ्याच क्षेत्रात उतरली आहे. अवघा समाजच जणू स्पर्धेच्या 'मोड'मध्ये आहे. अनावश्यक वेग पकडायला तो ऊर फाटेस्तोवर धावत सुटला आहे. वायुवेगाने वस्तू पोहोचवण्याची मानसिकता हेही या स्पर्धेचेच प्रतिबिंब आहे. गेल्या काही वर्षांपासून भारताच्या महानगरांमध्ये आणि आता तर छोट्या नगरांमध्ये देखील एक विचित्र शर्यत सुरू झाली आहे. ही स्पर्धा प्रगतीची नव्हे, तर वेगाच्या अट्टहासाची आहे. आपण मागवलेले दूध, ब्रेड किंवा शॅम्पू आपल्या दारापर्यंत १० मिनिटांत पोहोचविण्यासाठी रस्त्यावर हजारो तरुण रक्ताचे पाणी करीत आहेत. २५ व ३१ डिसेंबरला देशभरातील या 'गिग वर्कर्स'नी त्यासाठी संप पुकारला होता. त्या आंदोलनानंतर 'डिलिव्हरी पार्टनर्स'च्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला. केंद्र सरकारनेही त्या जीवघेण्या दहा मिनिटांच्या पद्धतीवर बंदी घालण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यामुळे आता अशा साऱ्या कंपन्यांना त्यांच्या जाहिराती बदलाव्या लागणार आहेत. खरे तर, घरोघरी वस्तू पुरवणाऱ्या या कंपन्यांमध्ये सुरू असलेली स्पर्धा ही ग्राहकांच्या सोयीपेक्षाही 'कोण कोणाला मागे टाकतो' या अहंकाराची जास्त आहे. कुणी १५ मिनिटे म्हणतोय म्हणून दुसरा १० मिनिटांचा दावा करीत होता, तर तिसरा ९ मिनिटांतच वस्तू पोहोचविण्याची हमी घेत होता. पण त्यामागे दडलेली वेठबिगारी अत्यंत भयावह आहे. या कंपन्यांच्या 'अल्गोरिदम'मध्ये माणसाला माणूस नाही, तर केवळ एक 'डॉट' समजले जाते. कारण त्यात भावनेला अजिबात थारा नाही.

ज्या वयात हातात पुस्तके असायला हवीत किंवा डोळ्यात उज्ज्वल भविष्याची स्वप्ने असायला हवीत, ते कोवळ्या वयाचे तरुण हातात गाडीचे 'हॅण्डल' आणि पाठीवर वस्तूंची 'बॅग' घेऊन सुसाट सुटले होते. त्यांना भीती होती ती कंपनीची श्रेणी कमी होण्याची किंवा वेळेत न पोहोचल्यास त्यांना मिळणारे पैसे कापले जाण्याची. या दबावाखाली ते मग पथदिव्यांच्या नियमांना जुमानत नव्हते, स्वत:सोबत रस्त्यावरील निष्पाप नागरिकांचा जीवही धोक्यात घालत होते. कारण त्यांना कंपनीनेच रस्त्यावरील 'सुसाईड स्क्वॉड' बनवूनच सोडले होते. सरकारी आणि खाजगी सर्वेक्षणातून समोर आलेली याबाबतची आकडेवारी डोळ्यात अंजन घालणारी आहे. एका अहवालानुसार, भारतात गेल्या दोन वर्षांत 'डिलिव्हरी'च्या कामात असलेल्या या 'गिग वर्कर्स'च्या अपघातांचे प्रमाण ३० ते ४० टक्क्यांनी वाढले आहे. रस्ते अपघातांत दरवर्षी शेकडो 'डिलिव्हरी पार्टनर्स' आपला जीव गमावत आहेत. दर १० पैकी ३ अशा तरुणांनी मान्य केले की, त्या दहा मिनिटांच्या दबावामुळे त्यांना किमान एकदा तरी गंभीर अपघाताला सामोरे जावे लागले आहे किंवा ते किरकोळ जखमी तरी झाले आहेत. केवळ अपघातच नाही तर सततचे मानसिक ताण, पाठीचे आजार आणि प्रदूषणाशी होणारा सामना यामुळे या तरुणांचे आरोग्यही कमालीचे खालावले आहे. वेगाने गाडी चालवल्यामुळे होणारा इंधनाचा अपव्यय आणि कार्बन उत्सर्जन हा पर्यावरणासमोरील धोका वेगळाच आहे. पण आता शासनाच्या निर्णयाने देशाच्या तरुणांना यातून काही प्रमाणात तरी दिलासा मिळणार असे गृहीत धरू या.

जीवनाच्या काही क्षेत्रांत वेग अनिवार्य असतो. जसे, जीव वाचवण्यासाठी रुग्णवाहिकेचा वेग समजण्यासारखा आहे. एखादी रुग्णवाहिका जेव्हा सायरन देत सुसाट जाते तेव्हा आपण तिला मार्ग देतो, कारण तिथे प्रश्न जीवन वाचवण्याचा असतो. तिथला प्रत्येक सेकंद मोलाचा असतो. पण घरात संपलेला किराणा १० मिनिटांतच घरी आला नाही तर काहीच बिघडत नाही. तसे 'होम डिलिव्हरी'बद्दल आमचे काहीच म्हणणे नाही. पण ही सोय करणाऱ्या कंपन्यांनी आम्हाला अनावश्यक वेळेच्या वेगाचे आमिष तरी का द्यावे आणि आम्ही ते का स्वीकारावे, हा खरा प्रश्न आहे. कारण त्यामुळे अशा कंपन्या रस्त्यावर मृत्यूचा खेळ मांडतात. आपण परीक्षेला जाताना किंवा नोकरीच्या मुलाखतीला जाताना अर्धा तास आधीच घराबाहेर पडतो. मग वस्तूंची ऑर्डर आपण अर्धा तास आधी का देऊ शकत नाही? ग्राहकांनी याबाबतीत 'सॅडिस्ट' बनू नये आणि कंपन्यांनी आपल्या लाभासाठी गरीब तरुणांचा जीव धोक्यात घालू नये, एवढीच काय ती अपेक्षा आहे.

केंद्र सरकारने या १० मिनिटांच्या डिलिव्हरीवर बंदी घालताना अत्यंत परिपक्व विचार केला आहे. 'गिग इकॉनॉमी'च्या नावाखाली तरुणांकडून वेठबिगारी करवून घेतली जात आहे. त्यांच्या शोषणाचा आणि सार्वजनिक सुरक्षिततेचा असा खेळ आता खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट संदेशच सरकारने या निर्णयातून दिला आहे आणि तो अतिशय चांगला आहे. या सरकारी निर्देशामुळे केवळ तरुणांचे प्राण वाचणार नाहीत तर रस्त्यांवरील शिस्तही सुधारेल. कंपन्यांनी तंत्रज्ञानाचा वापर सुविधा देण्यासाठी नक्कीच करावा. पण मानवी जीवाला वेठीस धरू नये. सरकारने या निर्णयातून हेही स्पष्ट केले आहे की, मानवी जीवन हे कोणत्याही 'कॉर्पोरेट प्रॉफिट'पेक्षा आणि 'कस्टमर सॅटिस्फॅक्शन'पेक्षा श्रेष्ठ आहे.

सरकारने आपल्या वाट्याचा निर्णय घेतला आहे. 'ब्लिंकिट'ने त्या निर्देशांची अंमलबजावणीही केली आहे. त्यांच्या जाहिरातीतील दहा मिनिटांत डिलिव्हरीचा उल्लेख तत्काळ हटवण्यात आला आहे. अन्य कंपन्याही तसा बदल करतील. अन्यथा त्यांच्यावर कारवाई होईल. पण यापुढे आता समाजाची जबाबदारी सुरू होते. आपणही '१० मिनिटांत डिलिव्हरी' व्हावी अशी अपेक्षा सोडली पाहिजे. १० मिनिटांऐवजी जर ३० मिनिटांत वस्तू आली तर आभाळ कोसळणार नाही. उलट एका तरुणाचा जीव धोक्यात न घातल्याचे समाधान नक्कीच मिळेल. ज्यावेळी एखादा 'डिलिव्हरी बॉय' धापा टाकत तुमच्या दारावर येतो, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरचा घाम पाहा. १० मिनिटांच्या आत पोहोचण्यासाठी त्याने किती वेळा मृत्यूला हुलकावणी दिली असेल, याचा विचार करा. त्याला प्यालाभर पाणी विचाराल तर आणखी चांगले. प्रगतीचा वेग हा मानवी मूल्यांना सोबत घेऊन जाणारा असावा. ज्या व्यवस्थेत वस्तूचा वेग माणसाच्या जीवापेक्षा महत्त्वाचा ठरतो, ती व्यवस्था समाजासाठी घातक असते. सरकारने या व्यवस्थेला वेळीच चाप लावून पुन्हा एकदा सिद्ध केले की, भारत केवळ बाजारपेठ नाही, तर तो संवेदनशील माणसांचा देश आहे. आपणही घड्याळाच्या काट्यांपेक्षा काळजाची धडधड जपली पाहिजे. आपल्या १० मिनिटांच्या अट्टहासात कोणाचे आयुष्यच 'डिलिव्हर' होऊ देऊ नका. असा प्रयत्न करू पाहणाऱ्या कंपन्यांनाही त्यांच्या घराचा रस्ता दाखवा. हे करताना मात्र वेगाची मर्यादा पाळली नाही तरी चालेल!

# उद्धव ठाकरेंच्या सेनेच्या काळातील अग्निशमन दलाच्या घोटाळ्यांमुळे मुंबईकरांच्या जीवाला धोका

उत्तर गोव्यातील अरपोरा गावात असलेल्या बर्च बाय रोमियो लेन नाईट क्लबमध्ये ६ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत २५ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर ६ जण जखमी झाले. या निमित्ताने मुंबईतील आग सुरक्षा नियमांची पायमल्ली आणि अग्निशमन दलांची कार्यक्षमता हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. यापूर्वी २९ डिसेंबर २०१७ च्या रात्री लोअर परळमधील कमला मिल्स कंपाऊंडमधील पब्जमधील आगीत १४ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि ५५ हून अधिक लोक जखमी झाले होते. परंतु, गेल्या काही वर्षांमध्ये उघडकीस आलेले मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) अग्निशमन दलाशी संबंधित गंभीर घोटाळे पाहता उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या सत्ताकाळात मुंबईकर जनतेच्या जीवाशी खेळ झाला असेच म्हणावे लागते.

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या ताब्यात मुंबई महानगरपालिका असताना अग्निशमन दलाशी संबंधित अनेक घोटाळे झाले. एनओसी (NOC) वाटप घोटाळ्यामुळे अनेक उंच इमारती व व्यावसायिक संकुलांना अपुऱ्या अग्निसुरक्षा व्यवस्थेसह मंजुरी मिळाली आहे. आगीचे बंब, टर्नटेबल शिड्या तसेच इतर उपकरणे खरेदीतील अनियमितता आणि नोकरभरतीतील भ्रष्टाचार यामुळे दलाची सज्जताही धोक्यात आली आहे. भ्रष्टाचाराच्या या प्रकरणांच्या साखळीमुळे हजारो मुंबईकरांच्या जीवितास धोका उत्पन्न झाला आहे. कोणत्याही शहरात अग्निशमन यंत्रणा सदैव सुसज्ज असणे आणि आग सुरक्षा नियमांचे कठोर पालन होणे अत्यावश्यक असते. तथापि, प्रदीर्घ काळ मुंबई महानगरपालिकेची धुरा सांभाळणाऱ्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या सत्ताकाळात अग्निशामक दलाला सुसज्ज बनवणे तर बाजूलाच राहिले परंतु विविध उपकरणांची खरेदी, अग्निशमन विभागाची ना हरकत प्रमाणपत्रे जरी करणे यासारख्या बाबींना सोन्याची खाण समजत तत्कालीन सत्ताधारी आणि प्रशासकीय यंत्रणेने मोठ्या प्रमाणात घोटाळे केल्याने मुंबईकरांची सुरक्षा धोक्यात येत राहिलेली आहे. लोअर परळ येथील कमला मिल्स कंपाऊंडमधील मोजोस बिस्ट्रो आणि वन अबव्ह या पब्जमध्ये २९ डिसेंबर २०१७ च्या मध्यरात्रीनंतर लागलेल्या भीषण आगीत १४ लोकांचा होरपळून मृत्यू झाला आणि ५५ हून अधिक लोक जखमी झाले. याप्रकरणी दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे या संदर्भात महत्वाचे आहेत. उच्च न्यायालयाने म्हटले होते, ही दुर्दैवी घटना नागरिक प्रशासनाने (BMC) नियमांचे आणि अटींचे काटेकोरपणे पालन करण्यात आलेल्या अपयशाचा परिणाम आहे या घटनेने आमच्या आत्म्याला धक्का दिला आहे आणि बीएमसीने आता आपले घर व्यवस्थित करण्याची (Sets its house in order) वेळ आली आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाशी संबंधित पुढील प्रमुख घोटाळे गेल्या काही वर्षात उघडकीस आले आहेत: नोकरभरती घोटाळा: २०२३ मध्ये अग्निशमन दलाच्या ९१० पदांसाठी भरती प्रक्रियेदरम्यान हा घोटाळा उघडकीस आला. यामध्ये ६१ उमेदवारांना बनावट नियुक्ती पत्रे (Fake ppointment Letters) देऊन आणि खोटी वैद्यकीय तपासणी दाखवून त्यांच्याकडून मोठी रक्कम उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणात अग्निशमन दलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह काही खाजगी व्यक्तींना अटक करण्यात आली. पीडित उमेदवारांकडून सुमारे २.३ कोटी जमा करण्यात आल्याचे उघड झाले आहे. अग्निशमन सेवा शुल्क घोटाळा: मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात ५,000 कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप भाजप आमदार अमित साटम यांनी २०२१ मध्ये केला. बांधकाम परवानगी देताना विकासकांकडून अग्निशमन सेवा शुल्क न आकारता, नंतर हे शुल्क रहिवासी/सोसायटींकडून पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्याचे परिपत्रक काढण्यात आले होते. विकासकांकडून डोळेझाक करून टक्केवारी वसूल केल्याचा आणि नंतर रहिवाशांकडून शुल्क आकारण्याचा हा प्रकार असल्याचा साटम यांचा आरोप होता. गणवेश खरेदी घोटाळा: अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी लागणाऱ्या गणवेशाच्या खरेदीत घोटाळा झाल्याचे २०१४ च्या सुमारास केलेल्या एका चौकशीत उघड झाले होते. युनिफॉर्म पुरवणाऱ्या ठेकेदारांकडून गणवेशाऐवजी पैसे स्वीकारले जात होते आणि कर्मचाऱ्यांना स्वत:च्या पैशाने गणवेश खरेदी करावे लागत होते. या घोटाळ्यामुळे बीएमसीला सुमारे १२ कोटींचे नुकसान झाले होते. टर्नटेबल शिडी खरेदी घोटाळा: मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलासाठी ६८ मीटर उंच टर्नटेबल शिडी खरेदीसाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेत अनियमितता असल्याचा आणि एका विशिष्ट कंपनीला फायदा पोहोचवण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप भाजपने केला. भाजपच्या म्हणण्यानुसार या शिड्यांच्या खरेदीसाठी निविदांच्या अटी व शर्तींमध्ये हेतुपुरस्सर केलेल्या बदलांमुळे मॅजिरस जीएमबीएच या एकाच कंपनीला निविदा प्रक्रियेत सहभागी होता आले. यापूर्वी ६४ मीटर उंचीच्या शिडीची खरेदी सुमारे १0 कोटींना झाली होती. मात्र, यावेळी फक्त ४ मीटर जास्त उंचीच्या (६८ मीटर) शिडीसाठी प्रति शिडीमागे १0 कोटी अतिरिक्त खर्च केले गेले. याचाच अर्थ ४ शिड्यांसाठी सुमारे ४0 कोटींची अतिरिक्त रक्कम देण्यात आली. एकाधिकारशाही निविदा काढून अन्य पात्र कंपन्यांना प्रक्रियेतून दूर ठेवले गेल्याचा हा परिणाम होता. निविदांच्या अटी व शर्तींमध्ये हेतुपुरस्सर बदल केल्यामुळे स्पर्धा नाहीशी होऊन पालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले. अग्निशमन सेवा शुल्क घोटाळा: बीएमसीच्या अग्निशमन विभागात ५,000 कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप भाजपने २०२१ मध्ये केला. यामध्ये, बांधकाम परवानगी आणि भोगवटा प्रमाणपत्र देताना विकासकांकडून अग्निशमन सेवा शुल्क घेतले नव्हते. नियमानुसार सर्व थकबाकी भरल्याशिवाय आणि अग्निशमन दलाचे ना-देयता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र दिले जाऊ शकत नाही.

तरीही, हे शुल्क भरले नसतानाही ना-देयता प्रमाणपत्र आणि भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले. त्यानंतर हे शुल्क रहिवासी/सोसायट्यांकडून पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्याचे परिपत्रक काढण्यात आले होते.विकासकांना सूट देण्यासाठी हा घोटाळा करण्यात आल्याचा आरोप होता. याशिवाय, अग्निशमन दलाच्या ना-हरकत प्रमाणपत्र वाटप प्रक्रियेच्या संदर्भात गंभीर अनियमितता आणि भ्रष्टाचाराचे आरोप अनेकदा झाले आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये अग्निसुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष करून ना-हरकत प्रमाणपत्रे दिली गेली होती. हे सर्व घोटाळे नागरिकांच्या जीवित सुरक्षेशी थेट जोडलेले आहेत. त्यामुळे असे घोटाळे करून मुंबईकरांच्या जीविताशी खेळणाऱ्या लोकांना धडा शिकवण्याची संधी येऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने मुंबईकरांना उपलब्ध आहे. तातडीने कठोर कारवाई करून भ्रष्टाचाराची ही व्यवस्था सुधारण्यासाठी येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये जनहिताशी बांधील पक्षाला बहुमताने निवडून देणे अत्यावश्यक आहे.

**- प्रतिनिधी**

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# झगमगाटात हरविलेले लग्न

आज लग्न लावून घेताना कुणी विचारत नाही की मुलगा, माणूस म्हणून कसा आहे. तो संकटात उभा राहील का, जबाबदारी ओळखतो का, नात्यांना जपतो का- हे प्रश्न आता जुन्या वहीत बंद झाले आहेत. आजचा पहिला प्रश्न असतो, कुठली गाडी आहे? ब्रॅण्ड महत्त्वाचा असतो, माणूस नाही. चारचाकी जितकी मोठी, तितकी स्थळाची 'किंमत' जास्त! लग्न म्हणजे आयुष्यभराचा निर्णय राहिलेला नाही, तो केवळ एक व्यवहार झाला आहे. मुलीबाबतही परिस्थिती वेगळी नाही. तिचा स्वभाव, तिची सहनशीलता, समजूतदारपणा, आयुष्यातील चढ-उतार पेलण्याची क्षमता या गोष्टींची चौकशी फारशी कोणी करत नाही. उलट चर्चा होते ती लग्नात तिने कोणत्या डिझायनरचा ड्रेस घातला, रिसेप्शनसाठी बँक्वेट हॉल किती महाग होता, एन्ट्री किती 'ग्रॅण्ड' होती याची. मुलगी व्यक्ती म्हणून पाहिली जात नाही, ती पॅकेज म्हणून मांडली जाते. प्री-मॅरेज फोटोशूट हा तर विवाह व्यवस्थेचा आत्मा बनला आहे. दोन माणसं एकमेकांना खरंच ओळखण्याआधीच कॅमेऱ्यासमोर प्रेमाचा अभिनय करतात. डोंगर-दऱ्या, समुद्रकिनारे, किल्ले, रिसॉर्ट्स-पृष्ठभूमी भव्य असते, मात्र त्या फ्रेममध्ये भावनिक खोली मात्र नसते. फोटोमध्ये हास्य असतं, पण आयुष्यातील वास्तवाशी सामना करण्याची तयारी नसते. कॅमेऱ्यासाठी उभं राहणं सोपं असतं, संसारासाठी उभं राहणं कठीण असतं हे कुणी सांगत नाही. लग्न आता संस्कार राहिलेला नाही, तो एक इव्हेंट मॅनेजमेंट प्रोजेक्ट झाला आहे. किती पाहुणे, किती प्लेट्स, किती लाईट्स, किती ड्रोन शॉट्स-यावर लक्ष असतं. पण दोन कुटुंबे मानसिकदृष्ट्या जोडली जात आहेत का, दोन माणसं एकमेकांच्या त्रुटी स्वीकारायला तयार आहेत का, याचा विचारच होत नाही.



लग्नानंतर टिकणारा संसार महत्त्वाचा नसून, लग्नाच्या दिवशी सोशल मीडियावर किती लाईक मिळाले याला जास्त किंमत आहे. या सगळ्याची किंमत कोण चुकवतं? मध्यमवर्गीय आई-वडील. लोक काय म्हणतील या भीतिपोटी कर्ज काढलं जातं, बचत संपवली जाते. आयुष्यभर साठवलेली पुंजी दोन दिवसांच्या दिखाव्यासाठी उधळली जाते. आणि लोक? लोक दोन दिवस पाहतात, फोटो बघतात, टीका-तुलना करतात आणि तिसऱ्या दिवशी विसरून जातात. उरते ती कर्जाची पावती, ताणलेले नातेसंबंध आणि मानसिक थकवा. आज लग्नात आवाज इतका मोठा असतो की संवाद ऐकू येत नाही. संगीत कर्कश आहे, पण समजूतदारपणाचा सूर हरवलेला आहे. आणि मग काही महिन्यांतच तीच जोडपी वाद, गैरसमज आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली दबली जातात. घटस्फोटाचे आकडे वाढतात, नात्यांवरचा विश्वास ढासळतो. कारण लग्नाआधी भूमिका शिकवली गेली होती, जबाबदारी नाही. शहरी लग्नांत दिखाव्याची चढाओढ आहे, तर ग्रामीण भागात त्याची नक्कल सुरू झाली आहे. शहरातील झगमगाट गावात उतरतोय, पण शहरात असलेली आर्थिक क्षमता मात्र गावाकडे आलेली नाही. तरीही गावातील शेतकरी, मजूर, लहान व्यावसायिक आपल्या ऐपतीपलीकडे जाऊन लग्न करतात. कारण शहरातल्या नातलगांनी, सोशल मीडियाने आणि 'स्टेटस'च्या कल्पनेने गावालाही संक्रमित केलं आहे. पूर्वी गावात लग्न म्हणजे साधेपणा, आपुलकी आणि सामूहिक जबाबदारी होती. आज तिथेही डीजे, आतषबाजी, महागडे ड्रेस आले आहेत. पण त्याबरोबर कर्ज, ताण आणि मतभेदही आले आहेत. ग्रामीण भागात एकेकाळी मुलगा शेतात कसा राबतो, समाजात कसा वागतो, व्यसनमुक्त आहे का, यावर लग्न ठरत असे. मुलगी घर सांभाळेल का, संकटात कुटुंब सोडणार नाही ना, याकडे पाहिलं जात असे. आज ते निकषही बदललेत. मुलगा बाहेरगावी नोकरीला आहे का?, लग्नात किती लोक येणार?, व्हिडीओ शूटिंग कोण करतो? हे प्रश्न पुढे आलेत. परिणामी शहरासारखेच ताण ग्रामीण संसारातही शिरले आहेत. विवाह व्यवस्था समाजाची कणा असते. तीच जर दिखाव्याच्या ओझ्याखाली मोडत असेल, तर परिणाम फक्त दोन व्यक्तींवर नाही, तर संपूर्ण समाजावर होतात. नाती तुटतात, कुटुंबव्यवस्था कमकुवत होते आणि माणूस एकटा पडतो-फोटो, अल्बममध्ये हसत असला तरी प्रत्यक्ष आयुष्यात तो आतून रिकामा असतो. आता तरी हे थांबायला हवं. लग्न पुन्हा माणसांसाठी व्हायला हवं, कॅमेऱ्यासाठी नाही. ड्रेस, हॉल, गाडीपेक्षा स्वभाव, संस्कार आणि समजूतदारपणाला महत्त्व मिळायला हवं. नाहीतर आपल्याकडे सुंदर फोटो असतील, भव्य व्हिडीओ असतील पण टिकणारा संसार मात्र नसेल. आणि तेच या काळाचं सर्वात मोठं अपयश असेल.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# ममता राजकीय हुतात्मा ठरणार का?

कोलकाता येथे आयपॅक कंपनीचे प्रतीक जैन यांचे कार्यालय आणि निवासस्थानी अंमलबजावणी संचालनालयाने घातलेल्या छाप्याचे आणि त्यानंतर त्याठिकाणी धाव घेत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कारवाईत आणलेल्या अडथळ्याचे येत्या काळात पश्चिम बंगालच्याच नाही तर देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहेत. याठिकाणी ईडी आणि पश्चिम बंगाल पोलिस एकमेकांसमोर दंड थोपटून उभे झाले होते, त्यामुळे अनुचित संघर्षाची स्थिती उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली होती. सुदैवाने परिस्थितीने गंभीर वळण घेण्याआधीच तणावपूर्ण परिस्थिती तात्पुरत्या स्वरूपात का होईना नियंत्रणात आली, असे म्हणायला हरकत नाही.

या प्रकरणी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, राज्याचे पोलिस महासंचालक, पोलिस आयुक्त आणि अन्य वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची मागणी ईडीने सर्वोच्च न्यायालयात केली आहे. या प्रकरणात तृणमूल काँग्रेसनेही न्यायालयात कॅव्हेट दाखल केला आहे. त्यामुळे या प्रकरणात पुढील आदेश देण्याआधी न्यायालयाला मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची बाजू ऐकून घ्यावी लागणार आहे. त्यामुळे आता या प्रकरणी सर्वोच्च न्यायालय कोणता निर्णय देणार याकडे सगळ्यांचे लक्ष राहणार आहे. ममता बॅनर्जी या राजकारणी असल्या तरी त्याच्या आधी एक वकीलही आहेत. त्यामुळे आपल्या राजकीय आक्रमकतेचा परिणाम काय होणार, याचा अंदाज त्यांना नव्हता, असे म्हणता येणार नाही. काही ठोकताळे आपल्या मनाशी बांधूनच त्यांनी ईडीच्या पथकासमोर राजकीय तमाशा केला, असे दिसते. पश्चिम बंगालमध्ये येत्या काही महिन्यांत विधानसभा निवडणूक होणार आहे. ईडीच्या छाप्याचा पुरेपूर राजकीय फायदा उचलण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी हा सगळा प्रकार केला, असा संशय घ्यायला जागा नाही. त्यांच्यासारखी कुशल राजकारणी अनवधानाने कोणतीही कृती करणार नाही, हे नक्की. ईडीच्या छाप्याचे निमित्त करत ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारला जाणीवपूर्वक आपल्या शिंगावर घेतले आहे. यात त्यांचा 'चीत भी मेरी और पट भी मेरी' असा खेळ करण्याचा प्रयत्न आहे.

छाप्याची आमची कारवाई एका गुन्हेगारी घटनेसंदर्भात होती, ती कोणत्याही राजकीय नेत्याविरुद्ध आणि पक्षाविरुद्ध नव्हती, असा खुलासा ईडीने न्यायालयात केला. कारण नसताना ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेस या प्रकरणात कुदली, असे दाखवण्याचा ईडीचा प्रयत्न आहे. ममता बॅनर्जी या अतिशय लढाऊ आणि आक्रमक नेत्या आहे. 'आली अंगावर तर घेतली शिंगावर' असा त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो. या आक्रमकतेचा पश्चिम बंगालमधील सलग तीन विधानसभा निवडणुकीत त्यांना राजकीय फायदा मिळाला, हे नाकारता येणार नाही. पण यावेळच्या अस्थानी आक्रमकतेचा ममता बॅनर्जी यांना फायदा मिळण्याची शक्यता कमी आणि त्यांचे राजकीय नुकसान होण्याची शक्यता जास्त दिसते. पाणी नसलेल्या अंधाऱ्या विहिरीत उडी मारल्यावर डोके फुटण्याशिवाय हाती काही लागत नाही, वेळप्रसंगी प्राणही गमवावे लागतात, तशी ममता बॅनर्जी यांची यावेळी स्थिती झाली आहे. ईडीचा छापा हा तृणमूल काँग्रेसच्या नेत्याच्या निवसस्थानी नव्हता, तर आयपॅक कंपनीच्या सहसंस्थापकाच्या निवासस्थानवर होता. प्रतीक जैन हे तृणमूल काँग्रेसच्या आयटी विभागाचे प्रमुख असले तरी राजकीय नेता म्हणून त्यांची प्रतिमा नाही. आयपॅक कंपनीचे म्हणूनच ते ओळखले जातात. त्यामुळे या प्रकरणात अनावश्यक हस्तक्षेप करत ममता बॅनर्जी यांनी 'आ बैल मुझे मार' करून घेतले आहे. ईडीच्या छाप्याच्या ठिकाणी आपण पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री म्हणून नाही, तर तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून गेलो होतो, असा दावा ममता बॅनर्जी करत असल्या तरी तो पटण्यासारखा नाही. कारण त्या जर तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून छाप्याच्या ठिकाणी गेल्या होत्या, तर त्याच्यासोबत राज्याचे पोलिस महासंचालक आणि कोलकाताचे पोलिस आयुक्त कसे होते, याचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे. पोलिस महासंचालक आणि पोलिस आयुक्त असा फौजफाटा ममता बॅनर्जी यांच्यासोबत असल्यामुळे त्या छाप्याच्या ठिकाणी मुख्यमंत्री म्हणूनच गेल्या होत्या, असे स्पष्ट होते. मुख्यमंत्रिपद हा काही अंगरखा नाही, जो मनात आला तेव्हा घातला आणि मनात आला तेव्हा काढला, तो २४ तासही अंगावर ठेवावाच लागतो. त्यामुळे मी या क्षणी मुख्यमंत्री आहे आणि याक्षणी नाही असे म्हणता येत नाही. आपला भाचा अभिषेक बॅनर्जीच्या लग्नात जाताना मी मुख्यमंत्री म्हणून नाही तर त्याची आत्या म्हणून गेले होते, असे एकवेळ त्या म्हणू शकतात, पण याठिकाणी त्या तसे म्हणू शकत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री म्हणून छाप्याच्या ठिकाणी जात ममता बॅनर्जी यांनी ईडीच्या पथकावर दबाव आणला, असा संशय घ्यायला पूर्ण जागा आहे. आणखी एक मुद्दा म्हणजे मुख्यमंत्री असल्या तरी ममता बॅनर्जी यांच्याजवळ गृहखातेही आहे, हे आपल्याला विसरता येणार नाही. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून त्या तेथे गेल्या असतील तर त्यांच्यासोबत पोलिसांचा फौजफाटा नाही तर तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते असायला हवे होते. महत्त्वाचे म्हणजे त्यांनी सरकारी गाडीने नाही तर खाजगी गाडीने त्याठिकाणी जायला हवे होते? आपण मुख्यमंत्री नाही तर तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून छाप्याच्या ठिकाणी गेलो होतो, हे ममता बॅनर्जी यांना सर्वोच्च न्यायालयात सिद्ध करावे लागेल. तसे सिद्ध करण्यात कमी पडल्या तर त्या अडचणीत येऊ शकतात. मुख्यमंत्री म्हणून त्या छाप्याच्या ठिकाणी आल्या होत्या, हे सिद्ध झाले तर न्यायालय त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचा आदेश देऊ शकते. न्यायालयाच्या आदेशाने एफआयआर दाखल झाला तर ममता बॅनर्जी यांना अटकही होऊ शकते. आणि अटक झाली तर त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागू शकतो. अशा परिस्थितीत स्वत:ला राजकीय हुतात्मा ठरवत या घटनेचा राजकीय फायदा उचलण्याचा प्रयत्न ममता बॅनर्जी करू शकतात.



या परिस्थितीत ममता बॅनर्जी यांच्यासमोर दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि झारखंडचे तत्कालीन आणि विद्यमान मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे उदाहरण असू शकते. अटक होण्याच्या आधी हेमंत सोरेन यांनी राजभवनात जाऊन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. केजरीवाल यांनी मात्र अटक केल्यानंतरही राजीनामा देण्याचे टाळले होते. दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून ते सहा महिने तुरुंगात होते. तुरुंगातून त्यांना मुख्यमंत्री म्हणून कारभार करता आला नसला, तरी मुख्यमंत्री म्हणूनचे ते तुरुंगात होते. अटकेचा ममता बॅनर्जी यांना राजकीय फायदा आणि सहानुभूती मिळण्याची शक्यता असेल तर त्यांना अटक न करण्याचा राजकीय शहाणपणा मोदी सरकारला दाखवावा लागेल. मात्र या घटनाक्रमुळे त्यांची राजकीय ताकद कमी होत असेल तर त्यांच्या अटकेची शक्यता बळावू शकते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने एफआयआर दाखल होऊन अटक झाली तर ममता बॅनर्जी यांची पुढील राजकीय भूमिका काय राहणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

९८८१७१७८१७

## मतदानासाठी हे लक्षात ठेवा

आज महाराष्ट्रात अनेक महानगर पालिकांसाठी निवडणूक होत आहे. प्रत्येक प्रभागामधून राखीव व अराखीव अशा तीन किंवा चार उमेदवारांना निवडून द्यायचे आहे. या पृष्ठभूमीवर माध्यमाद्वारे आणि अनेक वर्तमानपत्रांतून मतदानाविषयी जनजागृती करण्यात येत आहे आणि हे अत्यावश्यक आहे. अनेकांना विशेषकरून नवमतदारांना या प्रक्रियेची माहिती नसते. ''शेवटच्या उमेदवाराला मतदानानंतरच वाजेल बिप'' या मथळ्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहे. परंतु यातून योग्य अर्थ प्रेषित होत नाही, चुकीचा संदेश जाण्याची शक्यता जास्त आहे. मतदान कक्षात दोन ते चार बॅलेट युनिट असणार आहे आणि मतदान पूर्ण होण्यासाठी ''शेवटच्या'' उमेदवाराचे बटण दाबायला सांगणे सयुक्तिक नाही. याचा अर्थ बॅलेट युनिटवरील शेवटच्या उमेदवाराला किंवा नोटाला मतदान करा असा अनर्थ होतो. यात आक्षेपाची, भांडणाची परिस्थिती निर्माण होईल. यापेक्षा निष्पक्ष मतदानासाठी पांढरा, गुलाबी, निळा, पिवळा वगैरे रंगाच्या मतपत्रिकांवरील उमेदवाराचे नाव व चिन्ह बघून प्रत्येकी एक मत देण्याचे आवाहन केले पाहिजे. प्रत्येक रंगाच्या मतपत्रिकेवर आवडीनुसार किमान एक मत किंवा नोटाचे निळे बटण दाबण्याचे प्रशिक्षण अत्यंत गरजेचे आहे तेव्हाच मतदान प्रक्रिया वेळेत होईल आणि गोंधळाची परिस्थिती निर्माण होणार नाही. मतदाराद्वारे आवश्यक तेवढ्या उमेदवारांना मतदान न केल्याने बिप वाजत नाही त्यामुळे केंद्राध्यक्षाला अनेकदा मतदान कक्षात डोकावून पाहावे लागते ही बाब आक्षेपार्ह ठरते. यासाठी मतदान प्रक्रियेचे प्रशिक्षण अत्यावश्यक आहे. बहुतेक मतदान केंद्रे शासकीय इमारतीमध्ये असते. तिथे आवश्यक त्या सोयी सुविधा असल्याची खात्री प्रशासनाने केली पाहिजे.

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

## वाचक पत्रे

## अत्याधुनिक सुविधा आणि रोजगार यातील अदृश्य युद्ध

आजचा भारत वेगाने डिजिटल होत आहे. स्मार्ट सिटी, मेट्रो रेल्वे, ५ नेटवर्क, ऑनलाईन सेवा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, स्वयंचलित यंत्रणा या सगळ्या अत्याधुनिक सुविधांनी देशाचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. मात्र या झगमगाटामागे एक गंभीर वास्तव दडलेले आहे रोजगाराच्या संधी मात्र त्या वेगाने वाढताना दिसत नाहीत. याच विसंगतीतून सुविधा विरुद्ध रोजगार असे एक अदृश्य युद्ध सुरू झाले आहे.

शहरांमध्ये मोठ्या इमारती, आयटी पार्क, मॉल्स, मेट्रो, फ्लायओव्हर उभे राहत आहेत. सरकार आणि खाजगी क्षेत्र कोट्यवधींची गुंतवणूक करत आहेत. पण या प्रकल्पांमुळे निर्माण होणारा रोजगार बहुतेक वेळा तात्पुरता, ठेकेदारीचा किंवा कौशल्याधारित मर्यादित स्वरूपाचा असतो. दुसरीकडे लाखो युवक शिक्षण पूर्ण करून स्थिर नोकरीच्या शोधात भटकत आहेत. आज यंत्र माणसाची जागा घेत आहेत. बँकेत कॅशियरऐवजी, कार्यालयात लिपिकाऐवजी सॉफ्टवेअर, कारखान्यात कामगाराऐवजी मशीन रोबोट ही प्रगती आहे, पण याच प्रगतीमुळे मानवी रोजगाराची दारे हळूहळू बंद होत आहेत. त्यामुळे सुविधा वाढतात, पण रोजगार कमी होतो हा विरोधाभास दिवसेंदिवस तीव्र होत आहे. ग्रामीण भागातील युवक शहरांकडे धाव घेत आहेत, कारण तिथे सुविधा आहेत. पण शहरांमध्ये स्पर्धा इतकी वाढली आहे की पदवीधर तरुणही डिलिव्हरी बॉय, कॅब ड्रायव्हर किंवा मजुरी अस्थायी कामांवर समाधान मानायला लागला आहे. यामुळे समाजात असंतोष, निराशा आणि असुरक्षिततेची भावना वाढते आहे. सरकार डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया अशा योजना आणत आहे. मात्र त्या योजनांचा प्रत्यक्ष फायदा सर्वसामान्य युवकांपर्यंत पोहोचतो का? हा खरा प्रश्न आहे. अत्याधुनिक सुविधा या जीवन सुलभ करतात, पण रोजगार नसेल तर त्या सुविधांचा उपभोग घेण्याची क्षमता लोकांकडे राहत नाही.

आज गरज आहे ती सुविधा आणि रोजगार यांचा समतोल साधण्याची. केवळ मोठे प्रकल्प नव्हे तर स्थानिक उद्योग, लघुउद्योग, शेतीपूरक व्यवसाय, कौशल्य विकास केंद्रे यावर भर दिला पाहिजे. यंत्रासोबत माणूसही आवश्यक आहे, हे धोरणकर्त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. जर सुविधा वाढल्या आणि रोजगार नाही, तर प्रगती केवळ आकड्यांपुरती राहील. पण जर रोजगार निर्माण झाले, तर सामान्य माणूसही त्या सुविधांचा खरा लाभ घेऊ शकेल. याच समतोलातच खऱ्या अर्थाने विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकते.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

## हुडकेश्वरमधील भटक्या श्वानांचा बंदोबस्त करा

हुडकेश्वर (बु) येथे भटक्या श्वानांचा प्रचंड हैदोस सुरू असून त्यांच्यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीविताला धोका उत्पन्न झाला आहे. परिसरातील गणेशधाम वसाहत, मेघदूत वसाहत, पिपळा फाटा आणि हुडकेश्वर गाव येथे किमान तीस ते चाळीस श्वानांची टोळी असून ते येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांवर भुंकत असतात. कधी कधी नागरिकांच्या मागे धाव घेऊन त्यांना सळो की पळो करून सोडतात. विशेषतः रात्री या श्वानांची फार मोठी भीती नागरिकांना असते. दिवसा शाळेत जाणाऱ्या मुलांवरही हे श्वान भुंकत असतात आणि त्यामुळे मुले घाबरतात. त्याचप्रमाणे हे श्वान रात्रभर भुंकत, रडत, ओरडत आणि किंचाळत असतात ज्यामुळे नागरिकांची झोपमोड होते. संध्याकाळी सहा-सात वाजतापासूनच या श्वानांचे भुंकणे सुरू होते ते रात्री बारा-एक वाजेपर्यंत सुरूच असते. भटक्या श्वानांचा ताबडतोब बंदोबस्त करून हुडकेश्वर परिसरातील नागरिकांना दिलासा द्यावा ही अपेक्षा.

**अतुल सोमेश्वर कावळे**/९७३०५३५१९६

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# १८ जानेवारीला किनी कदू येथे एकदिवसीय मराठी साहित्य संमेलन

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १५ जानेवारी :** येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखा अहमदपूरच्या वतीने रविवार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी चौथे जागल एक दिवसीय मराठी साहित्य संमेलन अहमदपूर तालुक्यातील किनी कदू येथे बसवसृष्टी, संविधान पार्क येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती भरगच्च पत्रकार परिषदेत मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष सत्यनारायण काळे यांनी मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यालयात केले.

उद्घाटन सोहळा सकाळी दहा वाजता होणार असून संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी प्रा.फ म शहाजिंदे, उद्घाटक महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बाळासाहेब जाधव, स्वागताध्यक्ष किनी कदू चे माजी सरपंच संजय पाटील, निमंत्रक राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्रा. डॉ.भीमराव पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

सकाळी ११ वाजता परिसंवाद असून अध्यक्षस्थानी महात्मा फुले महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अनिल मुंडे राहणार आहेत. या परिसंवादात प्राचार्य डॉ. चंद्रशेखर कळसे (जळकोट), प्रा. डॉ. विजयकुमार करजकर(लातूर), प्रा. डॉ. दत्ताहरी होनराव, प्रा.डॉ. म.ई. तंगावार (उदगीर), हरिदास तम्मेवार, प्रा. डॉ. बालाजी भंडारे व श्री.सुरेंद्र स्वामी सहभागी होणार आहेत.

दुपारी दोन वाजता कवी संमेलन होणार असून कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी कवी योगीराज माने राहणार आहेत. यात सहभागी कवी बालाजी मुंडे, अनिल चवळे, महेंद्र खंडागळे, दीपक बेले, कामाक्षी पवार, वर्षा लगडे- माळी, मीना तोवर, सय्यद शाहिदा बेगम, रंजना गायकवाड, अनिता येलमटे, शुभांगी बिराजदार, महेश मळगे, बालाजी सूर्यवंशी, ज्ञानेश्वर हंडरगुळे, अंकुश शिंदे, चंद्रशेखर मोरे, माधव वाघमारे, देवदत्त मुंडे, अनिता वलांडे, सुरेखा उस्तरगे, नर्सिंग इंगळे, दयानंद बिराजदार, गोविंद जाधव, रामदास कांबळे, तहसीन पठाण, नयन राजमाने, उषा भोसले, सुनीताने मोरे, ऋचा पत्की, सारिका देशमुख, सविता धर्माधिकारी, रजनी गिरवलकर, सुलोचना मुळे, विजया भंणगे यासह मान्यवर कवींचा सहभाग होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष सत्यनारायण काळे, प्रमुख अतिथी प्रा. फ म शहाजिंदे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

या पत्रकार परिषदेला कार्यवाह प्रा. द मा माने, स्वागता ध्यक्ष संजय पाटील, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मोहिब कादरी, उपाध्यक्ष राम तत्तापुरे, कोषाध्यक्ष जिलानी शेख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.



**लातूर :** लातूर शहर महानगरपालिका निवडणूकचे आज १५ जानेवारी रोजी मतदान होते. यावेळी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी लातूर शहरातील विविध प्रभागांमध्ये काँग्रेस पक्षाच्या वतीने बूथ वरील पेंडॉलच्या ठिकाणी भेट दिली. काँग्रेस पक्ष वंचित बहुजन आघाडीचे सर्व उमेदवार निरीक्षक बूथप्रमुख यांच्याशी भेट घेऊन चर्चा केली.

# शिक्षणासोबतच ‘दयानंद’चे क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य : डॉ. भोसले

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** दयानंद शिक्षण संस्था आपल्या अद्ययावत सुविधा आणि क्रीडा क्षेत्रातील योगदानामुळे राज्यात अग्रस्थानी आहे. केवळ शिक्षणच नव्हे, तर क्रीडा आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही संस्थेने निर्माण केलेल्या सुविधा कौतुकास्पद आहेत, असे प्रतिपादन नांदेड उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांनी केले.

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित खुल्या गटाच्या निमंत्रित क्रिकेट स्पर्धेसाठी लातूर जिल्हा निवड चाचणी सामन्यांचे आयोजन दयानंद शिक्षण संस्थेच्या मैदानावर करण्यात आले होते . त्याप्रसंगी डॉ. बाबासाहेब भोसले बोलत होते. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या सामन्यांमधील कामगिरीच्या आधारे लातूर जिल्हा क्रिकेट संघटनेचा संघ निवडला जाणार आहे.

यावेळी डॉ. बाबासाहेब भोसले यांनी दयानंदच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावाही घेतला. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील अद्ययावत ऑनलाइन लाईव्ह क्लास रूम्स, सुसज्ज प्रयोगशाळा, क्रीडा संकुल आणि इतर शैक्षणिक सुविधा यांची सविस्तर पाहणी केली. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी संस्थेच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला आणि दयानंद शिक्षण संस्था काळाच्या पाऊलखुणा ओळखून अद्ययावत सुविधांनी सज्ज असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. उच्च शिक्षण सहसंचालकांकडून खेळाडूंचे कौतुक यांनी क्रिकेट मैदानाची पाहणी करून खेळाडूंना स्पर्धेसाठी राज्यस्तरीय शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ. संग्राम मोरे, प्रा. डॉ. महेश बेंबडे, प्रा. डॉ. अशोक वाघमारे, प्रा. सौरभ जांभळे आदींसह प्राध्यापक आणि खेळाडू उपस्थित.

## रेल्वेच्या धडकेने तरुणाचा मृत्यू

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** लातूर ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील भातखेडा शिवारात रेल्वेच्या धडकेत एका ३५ वर्षीय अनोळखी पुरुषाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी दुपारी घडली.

पोलिसाच्या माहितीनुसार, भातांगळी येथील पोलिस पाटील महादेव मारोती भालेराव यांनी या घटनेची पोलिसांना खबर दिली. भातखेडा शिवारातील मेळकुंदे यांच्या शेतानजीक, रेल्वे पटरीच्या पूर्वेला १० किलोमीटर अंतरावर एका अनोळखी ३५ वर्षीय व्यक्ति रेल्वेच्या धडकेने जखमी अवस्थेत आढळून आला. या मृतदेहाची ओळख पटविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# जिल्ह्यात विविध ठिकाणी अवकाळी पाऊस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** बुधवारी लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणी अवकाळी पाऊस झाला. हा अवकाळी हरभरा, ज्वारी, गहू आदी रबी पिकांसाठी फारसा लाभदायक नसल्याने शेतकऱ्यांत चिंता व्यक्त केली आज आहे. जिल्ह्यात मागच्या चार दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्यानेही घाट्यात आलेल्या हरभऱ्यावर अळीचा प्रादुर्भाव होण्याची भीती शेतकरी बांधवांतून व्यक्त केली जात आहे. या अवकाळीचा सर्वाधिक फटका ऐन बहरात आलेल्या आंब्याला होण्याची चिन्हे आहेत.



मागच्या काही दिवसात ढगाळ वातावरणामुळे शहर आणि जिल्ह्याच्या बहुतांश भागातील थंडी बऱ्यापैकी ओसरल्याचे पाहावयास मिळत आहे. थंडी परतली नसून ढगाळ वातावरणामुळे कमी झाली असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे. जिल्ह्याच्या अहमदपूर, उदगीर, जळकोट तालुक्यांमध्ये जोरदार वाऱ्यासह हा पाऊस झाला. त्यामुळे पिकांसोबतच सगळ्यात जास्त नुकसान नुकत्याच मोहोराचे लगडलेल्या आंब्याच्या झाडांना झाले. यावर्षीचा आंब्याच्या झाडांना लागलेला मोहोर पाहता निदान यावेळी तरी गावरान आंब्याचा मनसोक्त आस्वाद घेता येईल ,असे वाटत होते. परंतु म्हणतात ना, निसर्गाच्या लहरीपणापुढे कोणाचेच काही चालत नाही. अचानक निर्माण झालेल्या हवामानातील बदलांमुळे हे घडून आले. हा अवकाळी पाऊस फक्त लातूर जिल्ह्यातच नव्हे तर शेजारच्या बीड जिल्ह्यातही काही भागात झाल्याचे दिसून आले. लातूर तालुक्यातील काही भागातही तुरळक पाऊस झाला.

शेती हा अनिश्र्चिततेचा व्यवसाय असल्याचे बोलले जात. शेतकऱ्यांनी कितीही काबाडकष्ट केले, रात्रंदिवस मेहनत केली तरी निसर्गाच्या लहरीपणापुढे त्याचे काहीच चालत नाही. अगदी हातातोंडाशी आलेला घास हिरावून नेण्याचे काम निसर्गाकडून आतापर्यंत अनेकदा झाल्याचे सर्वांनी अनुभवले आहे. यावर्षीच्या पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यानेही शेतकऱ्यांना फायद्याऐवजी नुकसानच सहन करावे लागले. शेतातील पाण्याचा निचरा वेळेत न झाल्याने रबीच्या पिकांची पेरणी ते निर्धारित वेळेत करू शकले नाहीत, हेहही एकप्रकारचे नुकसानच आहे. त्यामुळे निम्म्या शेतकऱ्यांना हरभरा पिकाच्या पेरणीला उशीर झाला. तो हरभरा आता फुलोऱ्यात, घाट्यात आलेला असताना अवकाळीने शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढवण्याचे काम केले आहे.

# ‘अबॅकस, एमटीएस’च्या गुणवंतांचा सत्कार



**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १५ जानेवारी :** किल्लारी येथे स्टेट लेव्हल अबॅकस परीक्षेत गुणवंत ठरलेल्या येथील सुपर मेट्रो ब्रेन अबॅकस क्लासच्या विद्यार्थ्यांचा तसेच एमटीएस परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात करण्यात आला.

या सत्कार सोहळ्यादरम्यान पालक मेळावा घेण्यात आला. त्यावेळी पत्रकार विश्र्वनाथ गुंजोटे, अमीर लदाफ, खदिर शिरगापुरे, अल्लाउद्दीन शिरगापुरे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र, ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.

अभ्यास व गणिती पद्धतीवर मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, नियमित सरावाचे महत्त्व तसेच गणित विषयातील गणिती पद्धतीने विचार करण्याचे तंत्र याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. अबॅकस शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता, स्मरणशक्ती व गणनाक्षमता कशी वाढते यावरही प्रकाश टाकण्यात आला. पालक बैठकीत पालकांशी संवाद साधत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी घरातील वातावरण, वेळेचे नियोजन व सकारात्मक प्रोत्साहन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले. कौशर शिरगापुरे यांनी प्रास्ताविक केले. श्रद्धा गुंजोटे, हर्षदा बालकुंदे, आभार अल्लाउद्दीन शिरगापुरे यांनी सुत्रसंचालन केले.

# हिंद-दी-चादर’ श्री गुरू तेग बहादूर साहिबजींचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विविध उपक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ जानेवारी :** धर्म, सत्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी बलिदान देणारे ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त त्यांचा गौरवशाली इतिहास, त्यांच्या त्यागाची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न शिक्षण विभागामार्फत केला जाणार आहे. यानिमित्त आजपासून जिल्ह्यात शिक्षण विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

‘प्रभात फेरी’च्या माध्यमातून शिक्षण विभाग करत आहे. प्रभात फेरी गुरूवार पासून (दि.१६ ते २३ जानेवारी) जिल्हाभरातील शाळांमधून निघणार आहे. नांदेड येथील आसर्जन परिसरातील (मोदी ग्राउंड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्र्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घराघरात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजींचा इतिहास पोहचविण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत २५ जानेवारीपर्यंत सर्व शाळांच्या नित्य परिपाठात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या शौर्यावर आधारित गीतांचे, त्यांच्या जीवनपटावर आधारित डॉक्युमेंटरी दाखविण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी तालुका, जिल्हास्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरावरील स्पर्धेतील विजेत्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तालुकास्तरावर १७ जानेवारीपर्यंत दरम्यान चित्रकला, गायन, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा होतील. जिल्हास्तरावर विजेत्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव नांदेड येथे आयोजित मुख्य सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येईल. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊनही सन्मानित केले जाईल.

हळपववळलहरवरी३५० या ऐतिहासिक सोहळ्याची व्याप्ती वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येत आहे. नागरिकांनी आणि तरुणाईने हळपववळलहरवरी३५० या हॅशटॅगचा वापर करून कार्यक्रमाशी संबंधित पोस्ट, फोटो आणि रिल्स सोशल मीडियावर शेअर करावेत, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

# मातृभूमी महाविद्यालयाचा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १४ जानेवारी :** विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या पदवीचा उपयोग देश व समाजहितासाठी करावे असे प्रतिपादन न्यायधिश डी बी म्हलाटकर यांनी केले ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ सलग्रित मातृभूमी महाविद्यालयाचा दीक्षांत समारंभ प्रसंगी बोलत होते .

समारंभाच्या अध्यक्षस्थानी मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतीश उत्तरे हे होते तर प्रमुख पाहुणे तहसीलदार राम बोरगावकर स्वारातीम विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा मारोतीराव गायकवाड साहित्यिक धनंजय गुडसूरकर प्राचार्य उषा कुलकर्णी यांची उपस्थिती होती यावेळी मातृभूमी महाविद्यालयाच्या बीसीए बीसीएस च्या विद्यार्थ्यांना पदवी वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

पुढे बोलतांना न्या. म्हलाटकर म्हणाले, मातृभूमी महाविद्यालयात संगणक विषयातील पदवी शिक्षणासाठी ग्रामीण भागासह शहर भागातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात शिक्षण घेत असतात. आज सायबर गुन्ह्यात वाढ होत आहे. त्यामुळे संगणक शिक्षणचा उपयोग सायबर गुन्हे कमी करण्यासाठी करावे. समाजात वावरताना तुम्ही कोणत्या क्षेत्रात जाता यापेक्षा तुम्ही तिथे कसे वागता, याला अधिक महत्त्व आहे. कायदा केवळ न्यायालयात नसतो, तर तो आपल्या वर्तणुकीत आणि शिस्तीत असतो. तुम्ही उद्याचे वकील, अधिकारी, डॉक्टर किंवा उद्योजक व्हाल, पण त्याआधी एक न्यायप्रिय नागरिक व्हा.




कार्यक्रमाची प्रस्ताविक प्रा. बिभीषण मद्देवाड यांनी केले तर सूत्रसंचालन स्वाती भांगे मॅडम व जाई शर्मा मॅडम यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्रा. रणजीत मोरे, प्रा. शितल पवार, प्रा. उस्ताद सय्यद, प्रा शिवांगी वट्टमवार, काळे अस्विनी, नेहा वाघमारे, प्रा काकरे प्रतीक्षा, ग्रंथपाल उषा सताळकर, रामकिशन भोसले, मादळे प्रदीप, दीपक रणदिवे, दयानंद टाके, विवेक देवर्षे, मयुर मुळे, संगीता दुडे, सय्यद सिमा, प्रकाश गायकवाड, जगदिशा ओंकारे, मुबारक पटेल, अर्चना बिरादार, गोल्डन गेट शाळेचे प्राचार्या वनिता सुगंधी, अर्चना मठपती, यांच्यासह शिक्षक शिक्षेत्तर कर्मचार्यांनी प्रयत्न केले.

# तांबाळा शेतकऱ्याचा मुलगा झाला वन अधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १५ जानेवारी :** तांबाळा गावातील जि. प. शाळेत शिक्षण घेतलेल्या शेतकऱ्याच्या मुलानी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवत सहाय्यक संचालक (वित्त व लेखा) पदावर निवड झाली आहे. गावातील पहिला क्लास वन अधिकारी झालेल्या गिरीश अप्पासाहेब मूळे यांचा यशामुळे तांबाळा येथील गावकऱ्यांनी गौरव करून आनंदोत्सव साजरा केला.

## तांबाळा गावाने साजरा केला शेतकरी सुपुत्राचा गौरव

तांबाळा येथील कोरडवाहू शेती करणारे अप्पासाहेब मूळे व सविता मूळे यांचे सुपुत्र गिरीश मूळे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. त्यांचे पहिली ते चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत, तर पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण शन्मुखेश्वर



विद्यालय, तांबाळा येथे झाले. पुढे उमरगा येथील शिवाजी महाविद्यालयातून अकरावी-बारावीचे शिक्षण पूर्ण केले. बी. कॉम. पदवी सोलापूर येथील दयानंद महाविद्यालयातून, तर एम. कॉम. पदवी संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी पूर्ण केली. त्यांनी २०२१ पासून लातूर येथे स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात केली.

कठोर परिश्रमांच्या जोरावर त्यांनी पहिल्याच प्रयत्नात एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण करत टॅक्स असिस्टंट पद मिळवले. मुंबई मंत्रालयात कार्यरत असतानाही त्यांनी उच्च पदासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले. अखेर ५ जानेवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या निकालात गिरीश मूळे यांची सहाय्यक संचालक पदावर निवड झाली. गिरीश पहिल्यांदाच गावात येत असल्याने रविवार, दि. ११ जानेवारी रोजी त्यांचा गौरव करण्यात आला.

हा नागरी सत्कार सोहळा म. नि. प्र. विजयकुमार स्वामी व उपसरपंच बस्वराज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सतीश हानेगावे, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. वक्त्यांनी गिरीश मूळे यांच्या जिद्द, चिकाटी व संघर्षमय प्रवासाचे कौतुक करत हा यशप्रवास ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले.

# उस्तुरीत विद्यार्थ्यांनी भरवला बाल बाजार

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १५ जानेवारी :** तालुक्यातील उस्तुरी येथील जि.प.शाळेच्या प्रांगणात शाळेतील विध्यार्थ्यांनी बालबाजाराचे आयोजन केले होते.आपल्या चिमुकल्यांनी भरविलेला बाल बाजार पाहण्यासाठी व खरेदीसाठी पालकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.चिमुकल्यांच्या या बालबाजारात जवळपास पँचवीस हजार रुपयांची उलाढाल झाली असुन या माध्यमातुन विद्यार्थ्यांना जीवनाचे धडे देण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या बाल बाजाराचे उद्घाटन उस्तुरीचे सरपंच मल्लिकार्जुन दानाई, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भालचंद्र पाटील, बडूर केंद्रीय शाळेच मुख्याध्यापक बळवंत सरवडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी तंटामुक्ती अध्यक्ष सुरेश किवडे, महेशंकर शेट्टे, शेखर पाटील, परमेश्वर हंबरडे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ तसेच महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या बाल बाजारामध्ये भाजीपाला, किराणा दुकान, कटलरी, खाऊचे वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ, बांगड्या विविध प्रकारचे खेळ इत्यादी विविध प्रकारचे दुकाने



बाल बाजारामध्ये थाटली होती.

या बाल बाजारात सर्व मुलांनी पारंपारिक वेशभूषा परिधान केले होते. बाजारातील ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या जाहिरात करुन आपल्या मालाची विक्री करत होते.

रोख रक्कम यासोबत विध्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीची ओळख व्हावी या उद्देशाने फोन पे, गुगल पे द्वारे पैशांची देवाण घेवाण करण्याचे महत्वही शिकविले.





बीड शहरातील शाहुनगर भागातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे मकरसंक्रांतनिमित्त वाण देण्यासाठी महिलांनी गर्दी केली होती दुसऱ्या छायाचित्रात श्री क्षेत्र कंकालेश्वर मंदिरात गर्दी झाली होती तिसऱ्या छायाचित्रात महिलांनी एकमेकींना हळदीकुंकू लावले.(छाया कृष्णा शिंदे)

# क्षीरसागर यांच्या पाठिंब्यामुळे विनोद मुळूक उपाध्यक्ष!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जानेवारी**

बीडचे आ संदीप क्षीरसागर यांच्या गटाने अजित पवार गटाचे उमेदवार विनोद मुळूक यांना नगर परिषद उपाध्यक्ष पदासाठी बिनविरोध पाठिंबा दिला. त्यामुळे मुळूक यांची उपाध्यक्ष पदी निवड झाली. क्षीरसागर मुक्तीचा नारा देणाऱ्या पंडिताना शेवटी एका क्षीरसागर ची मदत घ्यावीच लागल्याचे यावरून स्पष्ट झाले आहे.



बीड नगर परिषद निवडणुकीत अजित पवार गटाचा नगराध्यक्ष आणि १९ नगरसेवक निवडून आले होते. शिवसेनेचे तीन नगरसेवक आणि काँग्रेस, एमआयएम ने पाठिंबा दिल्याने त्यांची संख्या २५ झाली होती. मात्र बहुमतासाठी आ संदीप क्षीरसागर यांची मदत आवश्यक होती.

आ क्षीरसागर कोणाला पाठिंबा देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. निवडणूक निकालानंतर आ विजयसिंह पंडित यांनी बीड क्षीरसागर मुक्त झाल्याची प्रतिक्रिया दिली होती. मात्र उपाध्यक्ष पदासाठी त्यांना आ संदीप क्षीरसागर यांचा पाठिंबा घ्यावा लागला आहे.

आ संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा झाल्यानंतर बीडमध्ये पाठिंब्याचे पत्र दिले. भाजपकडून डॉ सारिका क्षीरसागर यांनी अर्ज दाखल केला होता.उपाध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस चे मताधिक्य अधिक असल्याने उपाध्यक्ष म्हणून विनोद मुळूक यांची निवड झाली.

पाच स्वीकृत सदस्य

नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी मोईन मास्टर, दिनेश मुंदडा, गोविंद शिराळे, रवींद्र कदम आणि मकसूद पठाण यांची बिनविरोध निवड झाली.



बीड जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार यांनी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयास भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे, उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे, संचालक दत्ता (काका) डाके, सहाय्यक निबंधक सुरज जगदाळे, सहा.सचिव रवींद्र नाईकनवरे, लेखापाल उद्धव फपाळ,जयरामजी कांबळे

# पवनचक्की कंपनीचा शेतकऱ्यांच्या हक्कांवर घाला

## खाजगी शेतजमिनीत बेकायदेशीर विद्युत पोल व लाईन तात्काळ कायदेशीर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जानेवारी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरात पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कायदे, न्यायालयीन आदेश आणि शेतकऱ्यांचे मूलभूत हक्क अक्षरशः पायदळी तुडवत खाजगी शेतजमिनीत बेकायदेशीरपणे विद्युत पोल उभारून विद्युत लाईन टाकण्याचा उघड उघड मनमानी प्रकार केल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. कोणतीही लेखी परवानगी, संमती, पूर्वसूचना अथवा वैधानिक प्रक्रिया न करता थेट शेतजमिनीत घुसखोरी करण्यात आल्याचा गंभीर आरोप शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

सविस्तर माहिती अशी की, बीड तालुक्यातील मौजे लिंबागणेश येथील सर्व्हे नंबर १९७ मधील वडिलोपार्जित शेतजमीन डॉ. गणेश ढवळे यांच्या नावावर असून सदर जमीन त्यांच्या पूर्ण मालकी व प्रत्यक्ष कब्जात आहे. असे असतानाही टोरांटो पवनचक्की कंपनीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गावातील विद्युत पोल ओढण्याचे काम करणाऱ्या कंत्राटदारांना हाताशी धरून शेतकऱ्याला गृहीत धरत जबरदस्तीने शेतजमिनीत प्रवेश करून विद्युत पोल उभारले असून पुढील काळात विद्युत लाईन टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा घाट घातला आहे. हा प्रकार म्हणजे थेट शेतकऱ्यांच्या मालकी हक्कांवर केलेला घाला असल्याचे डॉ. ढवळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.सदर कृत्य हे भारतीय दंड संहिता कलम ४४१ व ४४७ अंतर्गत स्पष्टपणे फौजदारी स्वरूपाचा गुन्हा (Criminal Trespass) असून, जमिनमालकाची संमती नसताना खाजगी शेतजमिनीत प्रवेश करणे हा कायद्याचा उघड उघड अवमान आहे. तसेच विद्युत अधिनियम २००३ व Indian Telegraph -ct, १८८५ मधील तरतुदींचा सर्रास भंग करून हा प्रकार करण्यात आला असून, संबंधित अधिकाऱ्यांनी कायद्याला जाणीवपूर्वक केराची टोपली दाखवली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या स्पष्ट निकालानुसार जमिनधारकाची संमती किंवा कायदेशीर परवानगीशिवाय खाजगी शेतजमिनीत विद्युत पोल व विद्युत लाईन उभारणे हे पूर्णतः बेकायदेशीर ठरते. असे असतानाही पवनचक्की कंपनीने न्यायालयीन आदेशांनाही हरताळ फासल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.शेतजमिनीत उभारण्यात आलेल्या विद्युत पोल व प्रस्तावित उच्चदाब विद्युत लाईनमुळे शेतीचे तुकडे पडत असून शेती उपयोगात गंभीर अडथळे निमशर्फ्शाण झाले आहेत. तसेच भविष्यात अपघात, जीवितहानी व मोठ्या आर्थिक नुकसानीचा धोका निर्माण झाला असून, यास संपूर्णपणे संबंधित पवनचक्की कंपनी जबाबदार राहील, असा ठाम इशारा डॉ. ढवळे यांनी दिला आहे.सदर बेकायदेशीर विद्युत पोल व लाईन तात्काळ हटवून इतरत्र स्थलांतरित न केल्यास, संबंधित पवनचक्की कंपनीचे अधिकारी, कर्मचारी तसेच परवानगी देणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करून न्यायालयीन लढा व तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट आणि कठोर इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला आहे.

# उपनगराध्यक्षपदी सहाल चाऊस बिनविरोध निवड

## माजलगावात सुन नगराध्यक्ष तर सासरा उपनगराध्यक्ष

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१५ जानेवारी**

माजलगाव नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सहाल चाऊस यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपनगराध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज आल्याने सहाल चाऊस बिनविरोध निवड झाली. न प निवडणुकीत नगराध्यक्षपदी शिफा बिलाल चाऊस निवडून आल्या होत्या.. सहाल चाऊस यांची उपनगराध्यपदी निवड झाल्याने सुन अध्यक्ष तर सासरा उपनगराध्यक्ष झाले आहेत.



तर स्वीकृत सदस्य म्हणून विजय मोहनराव जगताप डॉक्टर सचिन देशमुख व अभिजीत पोटभरे यांची वर्णी लागली आहे.माजलगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत रा.कॉ.चे शरद पवार गटाच्या शिफा बिलाल चाऊस निवडून येऊन त्यांचे १० नगर सेवक, रा कॉ( अ प) गटाचे १० नगरसेवक,१ भाजप,१ एम आय एम, १ काँग्रेस व ३ अपक्ष नगरसेवक निवडून आले आहेत.नगर परिषद निवडणुकीत स्पष्ट बहुमत न मिळाल्याने सहाल चाऊस यांनी आ. प्रकाश सोळंके यांना गळ घातली व आ प्रकाश सोळंके यांनी समर्थन दिल्याने सहाल चाऊस यांच्या गळयात उपनगराध्यपदाची माळ पडली आहे.निवडणूकी दरम्यान दोन्ही रा कॉ ने एकमेकांवर खालच्या स्तरावर टिका केली होती. परंतु उपनगराध्यक्ष पद व स्विकृत नगरसेवकांच्या निवडी वेळी हे सगळं विसरून दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस एकत्र येऊन उपनगराध्यक्षपदीसहाल चाऊस निवड करण्यात आली तर स्वीकृत नगरसेवक म्हणून मोहन जगताप यांचा मुलगा विजय जगताप,बाबुराव पोटभरे यांचा मुलगा अभिजीत पोटभरे व डॉ. सचिन देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.

# खैसर राजा खान पठाण यांची परळी उपनगराध्यक्ष पदी

## स्वीकृत सदस्यपदी बाजीराव धर्माधिकारी, देवीप्रसाद पांडे, प्रणव मराठे, अजीज कच्छी







**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१५ जानेवारी**

नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीनंतर आता आज दिनांक १५ रोजी परळी नगर परिषदेच्या सभागृहात विशेष सभा पार पडली. या विशेष सभेत परळी नगर परिषदेचे उपाध्यक्ष पद व नामनिर्देशित सदस्यांच्या निवडी करण्यात आली. सकाळी अकरा वाजल्यापासून ही निवड प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली आहे. उपनगराध्यक्ष पदी खैसर राजा खान पठाण यांची निवड करण्यात आली. तर नामनिर्देशित सदस्य पदाकरिता सर्वश्री बाजीराव प्रकाशराव धर्माधिकारी, देवीप्रसाद चुन्नीलाल पांडे, प्रणव प्रकाश मराठे, अजीज अब्दुल हबीब कच्छी यांची निवड करण्यात आली.परळी नगरपरिषद निवडणूक २०२५ नंतर आता आज दिनांक १५ रोजी उपनगराध्यक्ष व नामनिर्देशित सदस्य म्हणून सदस्यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नगर परिषदेची ही विशेष सभा झाली असून पीठासन अधिकारी म्हणून विक्रम मांडुळके हे निवडणूक उपस्थित होते.दरम्यान, परळी नगर परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस भाजपा रिपाई व मित्रपक्ष महायुती ला भरभरून यश मिळालेले आहे.

# ग्राहक पंचायत महाराष्ट्र गेवराई येथे बैठक

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ जानेवारी**

गेवराई येथे ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांची बैठक ज्येष्ठ नागरिक कार्यालय येथे विरंगुळा केंद्र संपन्न झाली. बैठकीसाठी उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते सतीशजी देशमुख यांना निमंत्रित करण्यात आले होते. बैठकीत सर्वप्रथम विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पगुच्छ वाहून वंदन करण्यात आले. त्यानंतर संक्रांतीनिमित्त तिळगुळ चा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला .. बैठकीमध्ये गेवराई शहरातील अनेक कामगार ते सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांची मल्टीस्टेटमध्ये व इतर निधीमध्ये गुंतवणूक करण्यात आली परंतु त्याची फसवणूक झालेली आहे या गंभीर प्रकरण यावर चर्चा करण्यात आली व या प्रकरणांमध्ये ठेवेदारांबद्दल सहानुभूती दर्शवून त्यांना रक्कम प्राप्त होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. .तसेच यापुढे गुंतवणूक करताना ग्राहकांनी दक्षता विचारपूर्वक गुंतवणूक करणे अत्यंत आवश्यक आहे ज्यामुळे त्यांची फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी व इतर बाबीवर चर्चा करण्यात आली या बैठकीस बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे गेवराई ग्राहक पंचायत अध्यक्ष प्रा भानुदास फलके, प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल बाळकृष्ण मिसाळ अशोक देऊळगावकर, वल्लभ तौर, विश्वास चपळगावकर कैलास मडकर आधी हजर होते.



# तरुणांनी ध्येयप्राप्तीसाठी स्वामी विवेकानंदांचा आदर्श घ्यावा-जे.बी.कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जानेवारी**

दीनदयाल शोध संस्थान बीड येथे कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान, बीड व नानाजी देशमुख विद्यामंदिर यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांच्या मार्गदर्शनानुसार स्वामी विवेकानंद जयंती (राष्ट्रीय युवा दिन )आणि राजमाता जिजाऊ यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक, सेवानिवृत्त मुख्याध्यापक जे. बी. कुलकर्णी सर यांनी स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, स्वामी विवेकानंद हे केवळ अध्यात्मिक गुरु नव्हते, तर ते एक महान समाजसुधारक होते. त्यांनी पाश्चात्य जगाला भारतीय वेदांत आणि योगाची ओळख करून दिली. त्यांनी स्थापन केलेले रामकृष्ण मिशन आजही मानवतेची सेवा करत आहे.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी स्वामीजींचा प्रसिद्ध संदेश दिला तो म्हणजे उठा,जागे व्हा,ध्येय प्राप्ती पर्यंत थांबू नका.त्याचा हा विचार आजही तरुणांना प्रेरणादायी असल्याचे त्यांनी समर्पक उदाहरणे देऊन




सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुनंदाताई कुलकर्णी यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंदांच्या गुणांची महती सांगितली. त्या म्हणाल्या, जिजाऊ स्वतः दूरदृष्टी असलेल्या आणि सर्वगुणसंपन्न माता होत्या. त्यांच्या उत्तम संस्कारांमुळेच छत्रपती शिवाजी महाराज घडले. जिजाऊंनी प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या जबाबदाऱ्या अत्यंत समर्थपणे सांभाळल्या, ज्यातून आजच्या महिलांनी प्रेरणा घेतली पाहिजे. कौशल्या सोनसाळे यांनी 'जिजाई माझी सागर' हे गीत सादर केले. त्यानंतर अदिती देवणे, शिवाजी साबळे, श्रीकांत बोडखे, तन्वी क्षीरसागर, श्रेया औसेकर आणि अर्जित शिंदे या विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद व जिजाऊंच्या जीवनावर अभ्यासपूर्ण भाषणे सादर केली.या प्रसंगी समिती सदस्य श्री. एस. एन. कुलकर्णी, जन शिक्षण संस्थानच्या कार्यक्रम अधिकारी सौ. सीमा मनुरकर आणि प्रभारी मुख्याध्यापिका सौ. अर्चना मोराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सौ. अर्चना मोराळे यांनी तर सूत्रसंचलन सौ. जयश्री देशपांडे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षिका व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत महाजनवाडी जि.प.शाळेचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ जानेवारी**

बीड येथील जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित बीड तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत महाजनवाडी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले.या तालुकास्तरीय स्पर्धेत लहान व मोठा गट अशा दोन्ही गटांमध्ये महाजनवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी लांब उडी, धावणे, रिले, लंगडी तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला.लहान गटातील लंगडी (मुली) संघाने शिदोड शाळेचा १७ गुणांनी पराभव करून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच ४ह्न२५ मीटर रिले (लहान गट, मुली) या स्पर्धेतही प्रथम क्रमांक मिळवण्यात यश आले.

५० मीटर धावणे (लहान गट) मध्ये चि. पवन जाधव याने द्वितीय क्रमांक, तर लांब उडी (लहान गट, मुली) मध्ये कु. वैष्णवी भोसले हिने प्रथम क्रमांक मिळवून शाळेच्या यशात भर घातली. या सर्व विजयी विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.या यशामागे शि.वि.अ. अधिकारी प्रणिता गंगाखेडकर मॅडम, केंद्रप्रमुख दीपक घाटे सर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या प्रेरणेतून शाळेचे मुख्याध्यापक श्री. सर्जेराव आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक तुकाराम माळकर, अदिनाथ काटकर, रेश्मा रोहिटे मॅडम, धनश्री गोसावी मॅडम यांच्या अथक परिश्रमांचा मोठा वाटा आहे. तसेच महाजनवाडीतील सर्व ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हे यश शक्य झाले.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विधीज्ञ संघ उपाध्यक्षपदी ॲड. अंजली साबळे बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ जानेवारी -**

तुळजापूर तालुका विधीज्ञ संघाच्या उपाध्यक्षपदी ॲड. अंजली साबळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीनंतर विधीज्ञ संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला असून, सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



तुळजापूर तालुका विधीज्ञ संघाच्या अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी दि.१७ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. अध्यक्षपदासाठी ॲड. विवेक हिरोळीकर आणि जयवंत इंगळे यांच्यात थेट लढत होणार आहे. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाणार आहे.

उपाध्यक्षपदी ॲड. अंजली साबळे यांची बिनविरोध निवड झाल्यामुळे विधीज्ञ संघात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या कार्यकौशल्याबद्दल सर्व स्तरांतून कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.

### संक्षिप्त वृत्त...



## जगदाळे महाविद्यालयात नामविस्तार दिनानिमित्त व्याख्यान

**वाशी, दि.१५ जानेवारी -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक कदम होते, तर प्रमुख वक्ते प्रा. मिलिंद शिंदे आणि संयोजक प्रा.डॉ. रवी चव्हाण उपस्थित होते. प्रा. मिलिंद शिंदे यांनी विद्यापीठाच्या नामांतरासाठी सोळा वर्षे चाललेल्या संघर्षाचा आढावा घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उच्च शिक्षणावरील विचारांवर प्रकाश टाकला. नामांतर लढ्यात सर्व जाती-धर्मातील आंबेडकरी विचारवंतांचा सहभाग असून काही तरुणांनी बलिदान दिल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ. अशोक कदम यांनी नामांतराचा लढा सामाजिक अस्मितेचा असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व सर्वसमावेशक असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवी चव्हाण, सूत्रसंचालन प्रा. महादेव उंद्रे तर आभार प्रा. राहुल कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापकवृंद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कानेगाव येथे जिजाऊ-विवेकानंद जयंतीनिमित्त पालक मेळावा

**लोहारा, दि.१५ जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त पालक मेळावा व देणगीदार ग्रामस्थांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. ग्रामस्थांनी शाळेच्या भौतिक सुविधांसाठी दिलेल्या देणगीबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दादासाहेब बाबासाहेब कदम हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे विस्ताराधिकारी विश्वजीत चंदनशिवे, रविशंकर आगळे, सरपंच नामदेव लोभे, आनंद पाटील, अमोल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण अगंबरे, सूत्रसंचालन मच्छिंद्र बोकडे यांनी केले.

## बेलवाडी शाळेत जयंतीनिमित्त स्पर्धा

**लोहारा, दि.१५ जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील बेलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्र माळवदकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून लहु जाधव, गोविंद पाटील, तानाजी घंटे, अप्पाराव जाधव, प्रियंका राठोड, किसनराव कदम, अप्पासाहेब कदम उपस्थित होते.

# जि.प. व पं.स. निवडणुकांमुळे तुळजापूर तालुक्यात राजकीय वातावरण तापले

**तीन वर्षांचे प्रशासक राज संपुष्टात... ९ जि. प. गट व १८ पं. स. गणांत चुरशीचा सामना...**

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१५ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेले प्रशासक राज आता संपुष्टात येणार आहे. या निवडणुकांमुळे ग्रामीण भागातील राजकारण चांगलेच तापणार असून, तुळजापूर तालुक्यात ९ जिल्हा परिषद गट व पंचायत समितीच्या १८ गणांत चुरशीचा सामना रंगणार आहे.

गेल्या तीन वर्षांपासून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका न झाल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये निराशेचे वातावरण होते. मात्र, आता निवडणुका जाहीर झाल्यामुळे इच्छुकांनी पुन्हा जोमाने तयारी सुरू केली आहे. प्रशासक राजमुळे ग्रामीण भागातील विकास मोठ्या प्रमाणात रखडल्याची भावना नागरिकांत होती. अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मनमानीमुळे स्थानिक प्रश्न मार्गी लागत नव्हते. आता निवडणुकांमुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांना नवे लोकप्रतिनिधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

तुळजापूर तालुक्यातील जळकोट, अणदुर, शाहापूर, नंदगाव, मंगरूळ, काटगाव, काक्रंबा, सिंदफळ व काटी या ९ जिल्हा परिषद गटांत, तर सिंदफळ, आपसिंगा, काक्रंबा, सलगरा (दि.), जळकोट, होर्टी, अणदुर, चिवरी, मंगरूळ, आरळी बु., काटी, सावरगाव, काटगाव, ताम लवाडी, शाहापूर, येवती, नंदगाव व खुदावाडी या पंचायत समितीच्या १८ गणांत निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी तालुक्यातील १ लाख ९४ हजार ८९८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

नगरपालिका निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होत असल्याने सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. या निवडणुका अतिशय चुरशीच्या व रंगतदार होतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. महाविकास आघाडी व महायुती यांच्यात थेट लढत होणार की नगरपालिकेप्रमाणे बिघाडी होऊन पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवतील, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. नगरपालिका निवडणुकांत आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपला मिळालेल्या यशामुळे भाजप स्वबळावर निवडणूक लढवण्याची चिन्हे दिसत आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असल्याने त्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी सुरू आहे. १३ जानेवारी रोजी निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केल्यानंतर ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

या निवडणुकीसाठी १६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार असून २१ जानेवारी ही अंतिम तारीख आहे. ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. इच्छुकांची संख्या मोठी असल्याने बंडखोरी व पक्षांतराचे प्रमाण वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे सर्वच पक्षांसमोर उमेदवार निवडीचे आव्हान उभे राहिले आहे.

तुळजापूर तालुक्यातील जळकोट, नंदगाव, मंगरूळ, काटगाव व अणदुर या जि. प. गटांत विशेषतः चुरशीच्या लढती होण्याची शक्यता आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), वंचित बहुजन आघाडी हे पक्ष पूर्ण ताकदीने निवडणूक लढवणार आहेत. त्याचबरोबर एमआयएम पक्षही जोरदार तयारीत असून पूर्ण ताकदीने निवडणूक लढवणार, अशी माहिती एमआयएमचे नेते शहेबाज काझी यांनी दिली. त्यामुळे तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका बहुरंगी व अत्यंत चुरशीच्या ठरण्याची चिन्हे आहेत.




## कळंब येथे नामविस्तार दिन साजरा; नामांतर लढ्यातील शहिदांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ जानेवारी -**

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी तब्बल १८ वर्षे चाललेल्या ऐतिहासिक संघर्षाच्या आठवणींना उजाळा देत कळंब शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात नाम विस्तार दिन साजरा करण्यात आला. या संघर्षात अनेकांचे बलिदान गेले, घरे उद्ध्वस्त झाली, अन्याय-अत्याचार व जातीय दंगली झाल्यानंतर हे नाव मिळाले, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

याप्रसंगी बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नामांतर लढ्यातील शहिदांना विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास सतपाल बनसोडे, सुनील गायकवाड, शिवाजी शिरसाट, कुंदन गायकवाड, बंडूभाऊ बनसोडे, अनिल हजारे, राहुल हौसलमल, मोहन गायकवाड, राहुल मुळे, सचिन तीरकर, राजाभाऊ गायकवाड, प्रमोद ताटे, मुकुंद साखरे, संदीप सोनवणे, बाळासाहेब हौसलमल, माणिक गायकवाड उपस्थित होते.



## तुळजापूर शहरात नामविस्तार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ जानेवारी -**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नेते मिलिंद रोकडे, शहराध्यक्ष जीवन कदम, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर बनसोडे, तालुका महासचिव रवी साखरे, तसेच बाजीराव साबळे, शहाजी रोकडे, सामाजिक कार्यकर्ते नितीन निकम, संतोष कदम, बाळासाहेब सोनवणे, सुहास साबळे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महानायिका जन्मोत्सवानिमित्त मुरुममध्ये महिला नगरसेविकांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१५ जानेवारी -**



राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले व पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका फातिमा बी. शेख यांच्या जयंतीनिमित्त मराठा सेवा संघाच्या वतीने मंगळवारी मुरुम नगरपालिकेतील महिला नगरसेविकांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार प्रा.डॉ. महेश मोटे होते.

यावेळी डॉ. प्रीती चिलोबा, जिजाऊ ब्रिगेडच्या दैवशाला सावंत, सुप्रिया इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते महिला नगरसेविकांना फेटा बांधून शाल, पुष्पगुच्छ व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. महेश मोटे म्हणाले की, सावित्रीमाई फुले यांनी शिक्षणाचा वसा दिला, फातिमा बी. शेख यांनी सामाजिक सलोख्याचा संदेश दिला, तर जिजाऊंनी नेतृत्व व राष्ट्रनिर्मितीचे संस्कार दिले. या महानायिकांचा वारसा आजच्या महिला लोकप्रतिनिधींनी पुढे नेणे गरजेचे आहे. नवनिर्वाचित नगरसेविका ज्योती शेळके व अंकिता अंबुसे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे अध्यक्ष श्रीधर इंगळे, संजय सावंत यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक मोहन जाधव, सूत्रसंचालन अजिंक्य मुरुमकर तर आभार बाबा कुरेशी यांनी मानले. याप्रसंगी नगरसेविका महादेवी बनसोडे, अंकिता अंबुसे, निर्मला कंटेकुरे, मुमताजबी ढोबळे, ज्योती शेळके, सुनिता बन्ने, समीना मुल्ला, रागिनी गायकवाड यांचा गौरव करण्यात आला.

## नळदुर्ग येथे मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ जानेवारी -**

नळदुर्ग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी नामांतर लढ्यातील वाटाडे, धाडसी व निर्भीड भीमसैनिक रीपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे मराठवाडा कार्याध्यक्ष दुर्वास बनसोडे व रीपाई धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांचा समाजाच्या वतीने विलास येडगे व सामाजिक कार्यकर्ते अमर भाळे यांच्या हस्ते सत्कार करून गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संविधान चौकातील संविधान फलकास पुष्पहार अर्पण करून पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पत्रकार तथा बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी केले.

याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते व भीमसैनिक उपस्थित होते. फटाक्यांची आतषबाजी करत, तिळगुळ वाटून नामविस्तार दिन साजरा करण्यात आला.

## अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणी वाशी तहसीलवर मुक मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१५ जानेवारी -**

जवाहर नवोदय विद्यालय, जिल्हा लातूर येथे शिक्षण घेत असलेल्या अनुष्का किरण पाटोळे (वय १२) या विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर तिची निर्दयीपणे हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त करत वाशी तहसील कार्यालयावर मुक मोर्चा काढण्यात आला.

हा मुक मोर्चा दि.१५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता साठेनगर येथून तहसील कार्यालय, वाशी येथे काढण्यात आला. या आंदोलनाला मातंग समाज व लहुजी शक्ती सेनेचा मोठ्या संख्येने सहभाग लाभला. या वेळी निषेधार्थ वाशी शहरातील व्यापाऱ्यांनी दुपारी १ वाजेपर्यंत कडकडीत बंद पाळला.



टाका, ता. औसा, जि. लातूर येथील मातंग समाजातील अनुष्का किरण पाटोळे ही गुणवंत विद्यार्थिनी नवोदय विद्यालयात शिकत होती. तिचा मृत्यू अत्यंत संशयास्पद असून, नवोदय विद्यालय प्रशासनाने या प्रकरणाला आत्महत्येचे स्वरूप दिले आहे. मात्र, अनुष्काचा धाडसी स्वभाव, शालेय उपक्रमांतील सक्रिय सहभाग, हुशारी आणि सकारात्मक वागणूक पाहता, अवघ्या १२ वर्षांच्या मुलीने आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेणे अविश्वसनीय असल्याचे कुटुंबीय व समाजबांधवांचे म्हणणे आहे.

अनुसूचित जातीतील एका गुणवंत विद्यार्थिनीचा नवोदय विद्यालयासारख्या निवासी शैक्षणिक संस्थेत संशयास्पद मृत्यू होणे ही अत्यंत गंभीर बाब असून, या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी व्हावी, दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

या मुक मोर्चात श्रावण क्षीरसागर, नवनाथ शिरसागर, ऋतिक, समाधान क्षीरसागर, चंद्रकांत लोंढे, महादेव शिरसागर, रामभाऊ लगाडे, विकास शिरसागर, दीपक क्षीरसागर, पद्माकर शिरसागर यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडणुकीदरम्यान शस्त्रवाहतुकीवर बंदी

**धाराशिव, दि.१५ जानेवारी -**

राज्य निवडणूक आयोगाने जि.प. व पं.स. सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये हा आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्यावरील कर्मचारी, दंडाधिकारी अधिकार असलेले अधिकारी व बँक सुरक्षा कर्मचारी वगळता इतर सर्व परवानाधारकांना शस्त्र वाहून नेण्यास बंदी राहील.

# सुरतेची मोहीम लुट नव्हे, तर स्वराज्यासाठीची दूरदृष्टीपूर्ण रणनीती : केतन पुरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जानेवारी -**

छत्रपती शिवाजी महाराजांची सुरतेची मोहीम ही लुट नव्हती, तर स्वराज्य उभारणीसाठी आवश्यक असलेली रसद व आर्थिक बळ उभे करण्याची दूरदृष्टीपूर्ण रणनीती होती. या मोहिमेच्या ऐतिहासिक संदर्भांकडे दुर्लक्ष करून, इतिहासाचा अभ्यास नसलेल्यांकडून महाराजांच्या कर्तृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. अशा अपप्रचारातून इतिहासाची मोडतोड करण्याचा प्रयत्न होत असून, समाजाने याबाबत सावध राहावे, असे आवाहन इतिहास अभ्यासक केतन पुरी यांनी केले.

मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समितीच्या वतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात आयोजित भैरवाचा भंडारा व आग्रा स्वारी या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आ. कैलास पाटील, शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, जिजाऊ जन्मोत्सव समितीच्या अध्यक्षा प्रणिता पाटील, सचिव डॉ. अस्मिता बुरगुटे यांच्यासह सुरेखा जगदाळे, चंद्रकांत बागल, कल्याण पवार, शरद मुंडे, हुंकार बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

केतन पुरी यांनी आग्रा स्वारीचा प्रसंग प्रभावीपणे उलगडताना छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबासमोर दाखवलेले अद्वितीय बुद्धीचातुर्य, स्वराज्यासाठी जीव धोक्यात घालून केलेला थरारक प्रवास आणि अपमानाला न झुकता दिलेले सडेतोड प्रत्युत्तर यांची सखोल मांडणी केली. इतिहासाच्या पानांत दडलेले, क्वचितच चर्चेत येणारे अनेक संदर्भ त्यांनी उपस्थितांसमोर मांडले.

अफजलखान वधानंतर उत्तरेत पसरलेली महाराजांच्या पराक्रमाची कीर्ती, त्यानंतर औरंगजेबाने दिलेले आग्र्याचे आमंत्रण, आग्र्यात उसळलेली जनतेची गर्दी, तसेच औरंगजेबाने केलेले वारंवार अपमान या पार्श्वभूमीवर महाराजांनी दाखवलेली असामान्य रणनीती पुरी यांनी ठळकपणे मांडली. अहंकारी व मस्तवाल औरंगजेबाला धडा शिकवत महाराजांनी आग्र्यातून अलगद सुटका करून घेतली, हा प्रसंग स्वराज्याच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिलेला अध्याय असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला शिवप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली. इतिहासाचा सखोल अभ्यास आणि मांडणीतील वेगळेपणाबद्दल आ. कैलास पाटील यांनी केतन पुरी यांचे विशेष कौतुक केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहित बागल यांनी केले, सूत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. अस्मिता बुरगुटे यांनी केले. यावेळी केतन पुरी यांच्या आई-वडिलांचाही समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# महापालिका निवडणूकीसाठी ४२ टक्के मतदान

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १५ जानेवारी-

नांदेड वाघाळा महानगरपालिके निवडणूकीसाठी दुपारी साडे तीन वाजेपर्यंत ४१.६५ टक्के मतदान झाले. शहरातील काही मतदान केंद्रांवर मतदरांच्या रांगा होत्या. तर काही केंद्रावर तुरळक मतदार दिसून आले. किरकोळ प्रकार वगळता सायंकाळपर्यंत महापालिका प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या चोख बंदोबस्तात मतदान प्रक्रिया सुरळीत होती. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस पक्षाच्या दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. उद्या दि. १६ जानेवारी




रोजी पॉलिटेक्निकल कॉलेज येथील मतमोजणी होऊन निकाल घोषीत होणार आहे.

तव्यल ७ वयानंतर नदिड वाघाळा महानगरपालिकेची निवडणूक घेण्यात येत आहे. या निवडणुकीत २० प्रभागात ४९१ उमेदवार रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक १ ते १९ मध्ये ४ उमेदवार तर प्रभाग क्रमांक २० मध्ये ५ उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत. आज दि. १५ रोजी सकाळी ७:३० वाजेपासून मतदान प्रक्रिया सुरू झाली. प्रथम तुरळक प्रमाणात मतदार मतदानासाठी घराबाहेर पडले परंतु १० वाजेनंतर मतदारांची संख्या वाढत गेली. ७.३० ते ९. ३० या दरम्यान ७.१६% मतदान झाले तर ९.३० ते ११. ३० या दरम्यान १७. १४% मतदान झाले. यानंतर काहीशी गर्दी कमी झाली मात्र दुपारी ३ नंतर शहरातील काही मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या तर काही केंद्रांबर तुरळक गर्दी दिसून आली. दुपारी साडे तीन वाजेपर्यंत आलेल्या आकडेवारीनुसार सरासरी ४१.६५ टक्के झाले. सायंकाळी चारनंतर अनेक केंद्रावर गर्दी कायम होती. काही किरकोळ प्रकार वगळता सायंकाळी मतदान प्रतिक्रया सुरळीत होती.

# सारखणीच्या जंगलात आढळलेल्या मृतदेहाचा उलगडा

तभा वृतसेवा
माहूर, दि. १५ जानेवारी-

मकरसंक्रांतीच्या दिवशी (१४ जानेवारी २०२६) किनवट तालुक्यातील परंतु माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या सारखणी घाट परिसरात एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली होती. या प्रकरणाचा अखेर लगडा झाला असून, सदर महिला ही लगतच्या तेलंगणा राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले आहे. पैशांच्या वादातून तिचा खून करून मृतदेह महाराष्ट्रातील किनवट तालुक्यात आणून टाकल्याची धक्कादायक कबुली दोन आरोपींनी पोलिस तपासात दिली असून दोघांनाही पोलिसांनी अटक केली आहे.

## तेलंगणातील महिलेचा खून, दोन आरोपी अटकेत

दि. १४ जानेवारी रोजी माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे सारखणी घाट परिसरात राष्ट्रीय महामार्गालगत जंगलात एका अज्ञात तरुणीचा मृतदेह आढळून आला होता. घटनास्थळाची परिस्थिती पाहता खून करून मृतदेह येथे टाकण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला होता. तपासादरम्यान सदर मृतदेह हा लगतच्या तेलंगणा राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यातील पित्तलवाडा येथील इमराना जबीन (वय ३८) हिचा असल्याचे स्पष्ट झाले.

प्राप्त माहितीनुसार, इमराना जबीन ही मागील दोन महिन्यांपासून तिची बहीण समीना यास्मिन हिच्याकडे दासनापूर (जि. आदिलाबाद) येथे राहत होती. सुमारे एक वर्षापूर्वी तिने इंद्रवेल्ली येथील मोहम्मद फारुख खान याला तिच्या नावावर अंदाजे पाच लाख रुपये तसेच सोन्याचे दागिने गहाण ठेवून आणखी चार लाख रुपये दिले होते. दरम्यान, इमरानाने पैसे परत मागितले असता फारुख खान याने देण्यास टाळाटाळ केली. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी फोनवरून संपर्क साधत पैसे मागितले असता त्याने स्पष्ट नकार दिल्याने इमराना मानसिकदृष्ट्या अस्वस्थ झाली.

त्यानंतर दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळपासून इमरानाचा मोबाईल बंद झाला, तसेच ती राहत असलेले घर कुलूपबंद अवस्थेत आढळले. मात्र तिची ॲक्टिव्हा दुचाकी घरासमोरच उभी असल्याने संशय बळावला. अखेर मावळा पोलीस ठाण्यात ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती.

दरम्यान बेपत्ता प्रकरणाचा तपास सुरू असतानाच दि. १४ जानेवारी २०२६ रोजी मावळा पोलिसांनी मोहम्मद फारुख खान व रमेश या दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीत त्यांनी कबुली दिली कि, २६ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ते दुचाकीवरून पित्तलवाडा येथे गेले होते. पैशांच्या वादातून इमराना व फारुख यांच्यात भांडण झाले आणि त्याच वादातून इमरानाचा खून करण्यात आला.

खून केल्यानंतर फारुख खान याने कार भाड्याने घेऊन इमरानाचा मृतदेह आदिलाबादहून इचोडासोनाळा मार्गे किनवट येथे आणला व नंतर सारखणी घाट परिसरातील जंगलात रस्त्याच्या कडेला मृतदेह टाकून दगड व मातीने झाकून लपवल्याची माहिती सदरील आरोपींनी दिली.

दि. १४ जानेवारी रोजी मृतदेह आढळल्यानंतर तेलंगणातील मावळा पोलीस, सिंदखेड पोलीस, तहसीलदार व पंचांच्या उपस्थितीत घटनास्थळी पंचनामा करण्यात आला. तसेच रिम्स रुग्णालय, आदिलाबाद येथील डॉक्टरांच्या पथकाकडून घटनास्थळीच शवविच्छेदन करून सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

मृतदेह सिंदखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत आढळून आल्याने या प्रकरणाची सविस्तर माहिती मावळा पोलीस ठाण्याकडून अधिकृत पत्राद्वारे सिंदखेड पोलिसांना देण्यात आली आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## हदगावात भाजी भाकरीची पंगत

**हदगाव**-हदगावातील जुने महादेव मंदिर येथे मागील तेरा वर्षापासून भाजी भाकरीची पंगत करण्याची परंपरा आहे. या पंगतीला मंदिराच्या परिसरात ताज्या भाकरी करून, भाजून देण्याचे कार्य सुमारे चारशे भावीक महिला करतात. ही पंगत मकर संक्रातीच्या दुसऱ्या दिवशी दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. जुन्या हदगांव शहरातील वानवाडी परिसरात असलेल्या ईच्छापुर्ती महादेव मंदिरात मागील तेरा वर्षापासून भाजी भाकरीची पंगत सुरू आहे. या भाजी भाकरीच्या महाप्रसादाचा लाभ दरवर्षी हजारो भावीक घेतात. यावर्षी सुमारे पंचवीस हजार भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला. आज सकाळी आकरा वाजता इच्छापूर्ती महादेवाला अभिषेक करून महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली. इच्छापूर्ती महादेव मंदिर येथे गेल्या १२ वर्षापासून भाजी, भाकरी हा महाप्रसाद सुरु आहे. तामसा येथे भाजी, भाकरीच्या प्रसादाला बऱ्याच भक्तांना जाणे होत नसल्यामुळे कै. भीमराव पोगरे यांच्या संकल्पनेतून हदगाव शहरात भाजी, भाकरीच्या पंगतीला सुरुवात झाली. यावर्षीच्या भाजी भाकरीच्या पंक्तीमध्ये १७.५ क्विंटल टाळकी, ज्वारी व अंदाजे २५ क्विंटल भाजी यांचा प्रसाद करण्यात आला. यावर्षी वेगवेगळ्या ३५ ठिकाणी व प्रत्येक ठिकाणी पाच ते सहा चुली म्हणजे २०० लाकडाच्या चुलीवर सुमारे ४०० पेक्षा जास्त महिलांनी भाकरी भाजून देण्याचे कार्य केले. या भाजी भाकरीला लागणारे पीठ व्यवहारे यांच्या गिरणीतून विनामूल्य दळून देण्यात येते. तसेच भाकरी भाजण्यासाठी लागणारी लकडी हनवते यांच्या आराम मशीन वरून विनामूल्य कटई करून देण्यात येते. तर आठ ते दहा आचारी भाजी करण्यासाठी दिवसभर विनामूल्य सेवा करतात भाविक भक्तांकडून अन्नदान स्वरूपात व देणगी स्वरूपात सार्वजनिक वर्गणी मागून या ठिकाणी ही पंगत होते. या पंगती मध्ये सिंहाचा वाटा परिसरातील तरुण वर्ग व महिलांचा आहे. सर्व भक्तांना शेवटपर्यंत भाकरी सुमारे चारशे पेक्षा जास्त महिला श्रमदानातून स्वतः तयार करून देत असतात. तसेच हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी या परिसरातील सर्व तरुण मंडळी सतत प्रयत्नशील असतात. येथून १७ किलोमीटर अंतरावर तामसा जवळ असलेल्या बारालींग महादेव मंदिरातील भाजी-भाकरीच्या पंगतीला जाण्याची इच्छा असूनही अंतरामुळे, वेळेमुळे व तेथील गर्दीमुळे अनेक लोकांना शक्य होत नाही. परंतु महादेव मंदिरातील भाजी भाकरीचा प्रसाद घेण्याची इच्छा असलेल्या भाविकांसाठी हदगावच्या ईच्छापुर्ती महादेव मंदिरातील भाजी भाकरीचा ताजा व गरमागरम प्रसाद म्हणजे एक अनमोल संधीच असल्याचे भाविक सांगतात. या पंगतीला येऊन प्रसाद घेणारे भाविक स्वेच्छेने देणगी देतात.अशी माहिती श्री बसवेश्वर मित्र मंडळ ,पोगरे गल्ली, हदगाव यांनी दिली.



# काँग्रेसच्या गटनेते पदी नाजेमा खातुन पठाण यांची निवड

तभा वृतसेवा
मुदखेड, दि. १५ जानेवारी-

मुदखेड नगर परिषदेच्या निवडणुकीत माजी उपाध्यक्ष तथा मुस्लिम समाजाचे ज्येष्ठ नेते कै.

बंदे अली खा पठाण यांच्या सौभाग्यवती नाजेमा खातुन पठाण यांची नगर परिषदेत काँग्रेस पक्षाकडून गटनेते म्हणून नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कायदेशीरपणे मान्यता देत निवड केली आहे.

नाजेमा पठाण यांनी सांगीतले आहे कि नगर परिषदेत एक हाती सत्ता भारतीय जनता पार्टी यांच्याकडे असून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांना विश्वासात घेऊन योग्य निर्णय घेतल्यास काँग्रेस पक्ष पालिकेत सत्ताधारी भाजपला काही अंशी समर्थन करण्याची हमी यावेळी दिली.



मुदखेड नगरपरिषदेच्या निवडणुकीत शहरातील जनतेने एकूण २० सदस्य असलेल्या पालिकेत भारतीय जनता पार्टीचे एकूण १४ नगरसेवक आणि नगराध्यक्ष असून,काँग्रेस पक्षाला ४ आणि एम आय एम पक्षाचे २ नगर सेवक निवडून देत भारतीय जनता पार्टीला एक हाती सत्ता देत पाच वर्षाचा कार्यकाळ पारदर्शकपणे सांभाळण्यासाठी हवाली केले आहे. मधल्या काळात निवडून आलेल्या सर्व राजकीय पक्षांनी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची भेट घेत कायदेशीरपणे नगरपरिषदेत आपल्या गटनेत्याची निवड करत त्यात एम आय एम पक्षाचे अमीर हमजा आणि भारतीय जनता पार्टीचे माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक सुनील शेट्टे यांची नगरपालिकेत गटनेते मधून वर्णी लावून घेतली आहे.

याप्रसंगी नवनिर्वाचित नगरसेवक शेख अब्दुल खदीर, नगरसेवक अविनाश चौदंते, नगरसेविका गोदावरीबाई बोकेफोड, माजी नगरसेवक गंगाधर डांगे,युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष मुजीब पठाण, म.गौसभाई फुलवाले, युवा कार्यकर्ते बळाभाऊ क्षीरसागर,संजय बोकेफोड, यासह इतर काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## नगरपालिकेच्या कामकाजात लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांचा हस्तक्षेप

**किनवट** -किनवट नगरपालिकेच्या कामकाजात लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांचा हस्तक्षेप थांबविण्यासाठी रितसर कारवाई करणयाची मागणी पत्रकार अकरम चव्हाण यांनी एका निवेदन द्वारे केली आहे.



किनवट नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पालिकेत महिला नगराध्यक्षांसह १२ महिला नगरसेवक निवडून आले आहेत.यापैकी जवळपास सर्वच नगरसेविकांना पालिकेच्या कामकाजाचा कुठलाच अनुभव नाही.यामुळे महिला पदाधिकाऱ्यांच्या जागी त्यांचे नातेवाईक पालिकेचा कारभार करणार आहेत,हे दिसून येत आहे. या ठिकाणी लोकप्रतिनिधी यांचे पती किंवा इतर नातेवाईकांनी खुर्चीत बसल्यास प्रशासकीय कामकाजात त्यांचा अवाजवी हस्तक्षेप होणार आहे. कामकाजात हस्तक्षेप करून अधिकारी कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांनी दबाब आणल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांचा प्रशासकीय कामात हस्तक्षेप थांबविण्यासाठी नगर परिषदेच्या सभागृहासह सर्वच दालनात सीसी टीवी कॅमेरे बसवण्यात यावेत.किनवट नगर परिषदेत नगरसेवकाचे नातेवाईक प्रशासकीय कामात अडथळा किंवा निर्णय प्रक्रियेत भाग घेऊ नयेत,'महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम' या कायद्यानुसार, लोकप्रतिनिधीने आपल्या पदाचा दुरुपयोग करून नातेवाईकांना फायदा करून देणे किंवा त्यांना शासकीय कामात सहभागी करून घेणे हा गुन्हा ठरू शकतो. तक्रार सिद्ध झाल्यास संबंधित नगरसेवकाचे पद रद्द करण्याची तरतूद आहे. नातेवाईकांच्या हस्तक्षेपामुळे चुकीचे निर्णय घेतले जाउ शकते,तेव्हा त्यांचा हस्तक्षेप रोखण्यासाठी कायदेशीर या उपाययोजना करावी,अशी मागणी पत्रकार अकरम चव्हाण यांनी केली आहे.

## डॉ. दिलीप पुंडे यांना राष्ट्रपतींचे विशेष निमंत्रण

**मुखेड**-२६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाचे विशेष निमंत्रण राष्ट्रपती भवना मार्फत डॉ. दिलीप पांडुरंगराव पुंडे यांना प्राप्त झाले आहे. सदरील निमंत्रण हे 'रिसेप्शन ट होम' या कार्यक्रमाचे असून भारतामधून ११ डॉक्टरांना त्यांच्या विशेष कार्याबद्दल सन्मानाने निमंत्रित करण्यात आले आहे. त्यात मुखेड (नांदेड) या ग्रामीण भागात मागील ३८ वर्षांपासूनच्या सर्पदंशावरील विशेष कार्याची दखल घेत भारताच्या राष्ट्रपती महामहीम व राष्ट्रपती भवनामार्फत हे निमंत्रण डॉ. दिलीप पांडुरंगराव पुंडे यांना देण्यात आले आहे. नांदेड येथील मुख्य पोस्टातील वरिष्ठ अधिकारी श्री अरुण गायकवाड व त्यांची विशेष टिम व मुखेड पोस्टातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतः येऊन सन्मानाने हे निमंत्रण डॉ. दिलीप पुंडे व सौ. माला पुंडे यांना दिले . सदरील कार्यक्रम २६ जानेवारी रोज सोमवारी सायंकाळी चार वाजता राष्ट्रपती भवनात होणार आहे.



## खोब्रागडे नगरातील दुर्घटनेसाठी जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करा : आ. कल्याणकर

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १५ जानेवारी-

शहरातील खोब्रागडे नगर येथे बीओटी तत्वावर सुरू असलेल्या इमारतिच्या पाया खोदकाम होताना छत कोसळून झालेल्या दुर्घटनेत सामान्य लोकांची चार घरे उध्वस्त झाली आहेत . या दुर्घटनेची माहिती मिळताच आ. बालाजीराव कल्याणकर यांनी घटनास्थळी भेट देऊन आपतग्रस्ताना दिलासा दिला. तातडीची मदत म्हणून एक लाख रुपये दिले. दोषींवर कठोर करण्याच्या सूचनी दिल्या आहेत.

अण्णाभाऊ साठे चौक ते आयटीआय रोडवरील शासकीय गोदामाच्या ठिकाणी बीओटी तत्त्वावर बिल्डिंग उभारण्याचे काम सुरू आहे .यासाठी केतन नागडा नामक कुत्तेदाराच्या घशात महानगरपालिकेची जागा घालण्यात आली आहे . या जागेवर उभारण्यात येणाऱ्या इमारतीचे बांधकाम किती आणि कसे करावे याबाबतची परवानगी आहे का नाही याची परिपूर्ण माहिती महानगरपालिकेकडे ही नाही. इमारतीचा पाया खोदकाम करण्यात येत असताना. येथील छत कोसळल्याने तब्बल चार घरे उध्वस्त झाली आहेत. रात्री दोन वाजता ही दुर्घटना घडली असली तरी सर्वसामान्यांच्या जगण्याचे



जीवनावश्यक वस्तू आणि मौल्यवान वस्तू ही ढिगाऱ्याखाली गडप झाले आहेत. या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आ. बालाजीराव कल्याणकर यांनी घटनास्थळी तातडीने धाव घेतली. या दुर्घटनेतील आपतग्रस्तांना धीर देत एक लाख रुपयांची तातडीची मदतही केली. चारही घरांच्या पुनर्निर्मानासाठी आपण स्वतः पुढाकार घेऊन मदत करू . यात कोणत्याही प्रकारचे राजकारण नाही परंतु संबंधित इमारत उभी करत असताना शासनाचे नियम डावलण्यात आले का ? इतका खोल पाया खोदण्याची परवानगी देण्यात आली? का या सर्व बाबींची चौकशी केली जाईल .दोषींवर कठोरातील कठोर कारवाई केली जाईल अशी ग्वाही आ. कल्याणकर यांनी दिली आहे

# सगरोळीच्या सैनिकी विद्यालयात भारतीय थलसेना दिनी वीरपत्नींचा गौरव

तभा वृतसेवा
बिलोली, दि. १५ जानेवारी-

भारत मातेच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांच्या शौर्याला शब्द अपुरे पडतात. मात्र त्या शौर्यामागे उभ्या असलेल्या वीरपत्नींचे धैर्य, संयम आणि त्याग हे देखील तितकेच महान आहेत. भारतीय थलसेना दिनानिमित्त गुरुवार (दि. १५) रोजी सगरोळी (ता. बिलोली) येथील राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीद जवानांच्या 'वीरपत्नींचा सन्मान' करण्यात आला. या सन्मान सोहळ्यावेळी संपूर्ण परिसर भारावून गेला होता.



या भावूक प्रसंगी, सन २०२१ मध्ये जम्मूकाश्मीरमध्ये आतंकवाद्यांशी लढताना शहीद झालेले जवान ज्ञानेश्वर दूबकवाड यांच्या वीरपत्नी धूरपदा ज्ञानेश्वर दूबकवाड (रा. बचोटी, ता. कंधार), नक्षलवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत इंडोतिबेट सीमा दलात शहीद झालेले सुधाकर शिंदे यांच्या वीरपत्नी सुधा सुधाकर शिंदे (सिद्धार्थनगर, नांदेड), सन २०१६ मध्ये जम्मूकाश्मीरमध्ये आतंकवाद्यांशी लढताना शहीद झालेले संभाजी कदम यांच्या वीरपत्नी शीतल कदम (जनापुरी, ता. लोहा), ज्योती प्रफुल्ल गोवंदे (नांदेड) यांचे पती जम्मूकाश्मीरमधील ऑपरेशन रक्षकमध्ये शहीद झाले होते, तसेच आसाम येथे झालेल्या चकमकीत वीरमरण आलेले रामेश्वर बंडगर यांच्या पत्नी आशा रामेश्वर बंडगर (बिजूर, ता. बिलोली) यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यासह नांदेड जिल्ह्यातील वीस माजी सैनिकांचाही गौरव झाला. यावेळी अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते. अमर जवान स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

सुभेदार मेजर मोहनसिंग यांनी, भारतीय जवान सदैव सज्ज असल्यामुळेच आपला देश सुरक्षित आहे. आज विद्यार्थ्यांसमोर सैन्यात अधिकारी होण्यासाठी अनेक मार्ग खुले असून सराव व सातत्य हेच यशाचे गमक आहे. निवृत्त कॅप्टन प्रकाश कस्तुरे यांनी, शाळेत मिळणारे देशप्रेम व सैनिकी प्रशिक्षण देशसेवेसाठी उपयोगात आणावे असे आवाहन केले. संस्थेचे चेअरमन प्रमोद देशमुख यांनी, संयम, साहस, समर्पण आणि सन्मान हीच सैनिकांची खरी ओळख आहे. आजच्या सैनिकाने शस्त्रांसोबतच तंत्रज्ञानातही प्रावीण्य मिळवले पाहिजे, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी उपस्थित मान्यवरांना मानवंदना दिली. हा कार्यक्रम केवळ सन्मानाचा नव्हता, तर विद्यार्थ्यांच्या मनात देशसेवेची ठिणगी पेटवणारा प्रेरणादायी क्षण ठरला.

# तरुण भारतच्या बातमीने महावितरणला झटका !

## काल दुर्लक्ष, आज धावपळ जीवघेण्या तारांवर अखेर उपाययोजना

तभा वृतसेवा
देगलूर, दि. १५ जानेवारी-

देगलूर शहरातील विद्यानगर परिसरात नागरिकांच्या जीवावर उठलेल्या झोळलेल्या विजेच्या तारांचा प्रश्न दै. तरुण भारतच्या निर्भीड पत्रकारितेने मार्गी लावला आहे. काल दि. १५ जानेवारी रोजी दैनिक तरुण भारत मध्ये लोबकाळणाऱ्या विजेच्या तारा व उघड्या डीपीमुळे अपघाताची दाट शक्यता ! या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या धडाकेबाज वृत्तानंतर महावितरण प्रशासनाला चांगलाच झटका लागला, की अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना तातडीने मैदानात उतरावे लागले. दुर्लक्षित राहिलेल्या प्रश्नावर, आज दि. १५ जानेवारी रोजी महावितरणच्या कर्मचाऱ्यांची अक्षरक्ष: धावपळ सुरू झाली. याठिकाणी नवीन खांब (पोल) बसवत जीवघेण्या तारांवर अखेर उपाययोजना करण्यात आली.




शहरातील विद्यानगर भागातील वीज वितरण कंपनीच्या पोल क्रमांक ००००००५ (ग्राहक क्र. ५५८०१०६०७३५४) याठिकाणी दोन पोलमधील अंतर वाढल्यामुळे विजेच्या तारा थेट मानवी हाताच्या आवाक्यात येत होत्या. लहान मुलांचा खेळ, शाळकरी विद्यार्थ्यांची वर्दळ आणि ज्येष्ठ नागरिकांची ये-जा असलेल्या या भागात कोणत्याही क्षणी जीवघेणा अपघात होण्याची दाट शक्यता होती. तरीही महावितरणने दुर्लक्ष केले होते, ही बाब अत्यंत धक्कादायक होती. या प्रश्नासंदर्भात स्थानिक नागरिकांनी महावितरण विभागास निवेदनही दिले. पण आख्खा एक आठवडा उलटला तरी या गंभीर प्रश्नाकडे महावितरण प्रशासनाकडून कानाडोळा करण्यात आला. शेवटी ही जनतेची समस्या दैनिक तरुण भारत'चे प्रतिनिधी मिलिंद वाघमारे यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर ही गंभीर परिस्थिती तरुण भारतने काल दि. १५ जानेवारी (गुरुवारी) लोबकाळणाऱ्या विजेच्या तारा व उघड्या डीपीमुळे अपघाताची दाट शक्यता ! या मथळ्याखाली ठळकपणे जनतेसमोर आणली आणि प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा पर्दाफाश केला. त्याचा थेट परिणाम असा झाला की, बातमी प्रसिद्ध होताच महावितरणचे अधिकारी व कर्मचारी घाईघाईने सकाळीच घटनास्थळी दाखल झाले. याठिकाणी तातडीने नवीन विद्युत खांब उभारण्यात आला, झोळलेल्या तारांना वर उचलून सुरक्षित उंची देण्यात आली त्यामुळे संभाव्य अपघाताला पूर्णविराम मिळाला.

या भागातील जागरूक नागरिक संतोष अनिलराव कोल्हे यांनी दिलेल्या निवेदनास प्रतिसाद न देणाऱ्या प्रशासनाची तरुण भारतच्या एका बातमीने चांगलीच कानउघाडणी केली. बातमी प्रसिद्ध होताच काम काही तासांत करून दाखवले, हे विशेष उल्लेखनीय आहे. महावितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरण विभागाकडून त्वरित कार्यवाही करण्यात आली. गुत्तेदार श्री सादक यांच्या सुचनेनुसार प्रत्यक्ष घटनास्थळी विलास काळे, राजु काळे, संतोष भंडारे, माधव सोनकांबळे आदीं कर्मचाऱ्यांनी दोन खांबातील अंतर कमी करण्यासाठी एक नवीन खांब लावले. तसेच लोबकाळणाऱ्या तारांना व्यवस्थित करुन वर करण्यात आले. धोकादायक तारांचा शेवटी मार्ग निघाला. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, लहान मुलांसह संपूर्ण परिसराला मोठा दिलासा मिळाला आहे. ही घटना म्हणजे निर्भीड पत्रकारितेचा थेट विजय असून, फक्त बातमी नव्हे, तर जनतेच्या जीवाची जबाबदारी ही तरुण भारतची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. देगलूर शहरासह तालुक्यातील नागरिकांमध्ये तरुण भारतवरील विश्वास आणखी घट्ट झाला असून, प्रशासनालाही जनतेच्या सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचा इशारा या माध्यमातून मिळाला आहे.

